दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2021-2024
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● रविवार दि.२६ मार्च २०२३ ● पाने ४ ● वर्ष ३८ ● अंक १७३ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## थोडक्यात



### आठवडा बाजार व तात्पुरत्या स्थलांतराची जागा उद्या ठरणार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

येथे उभारण्यात येणाऱ्या भाजी मार्केटच्या भूमिपूजनाची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर उद्या संबंधित गाळेधारक व व्यापाऱ्यांच्या आठवडा बाजाराच्या तात्पुरत्या स्थलांतरासाठी पर्यायी जागेची पाहणी खुद्द मंत्री दीपक केसरकर उद्या करणार आहेत. तसेच दुपारी २ वाजता येथील कुटीर रुग्णालयाला ते भेट देणार असून त्यानंतर शहरात राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. श्री. केसरकर यांनी खास उद्याचा दिवस शहरातील विकास कामासाठी दिला आहे. आज याबाबत त्यांचा दौरा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### सावडाव येथे बिबट्याच्या हल्लयात गाईचा मृत्यू

**कणकवली । वार्ताहर**

सावडाव येथे बिबट्याच्या हल्लयात गाईचा मृत्यू झाला आहे. यात शेतकरी अनिल सावंत यांचे नुकसान झाले. दरम्यान परिसरात मोठ्या प्रमाणात बिबट्याचा वावर. वाढला असून आतापर्यंत अनेक पाळीव जनावरे त्याने मारून टाकली आहेत. त्यामुळे त्याचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा, तसेच नुकसानग्रस्तांना तात्काळ भरपाई मिळवून द्यावी, अशी म ागणी भाजपा जानवली विभाग अध्यक्ष राजू हिर्लेकर यांनी वनविभागाकडे केली आहे. तर तात्काळ कार्यवाही न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



### वाडा पालये परिसरातील बागायती आगीच्या भक्षस्थानी

**देवगड । वार्ताहर**

तालुक्यातील फणसे पडवणे पालये या भागातील सुमारे पन्नास हून जास्त देवगड हापूसच्या बागा लागलेल्या आगीमध्ये जळून गेल्या. या बागा जळल्याने आंबा बागायतदारांचे फार मोठे नुकसान झाले आहे काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात आंबे होते कलमे जळल्याने आता पुन्हा कलमे उभी करणे अथवा उर्वरित कलमांना जगवणे ही गोष्ट बागायतदार यांना करावी लागणार आहे. आमदार नितेश राणे यांनी आपण याबाबत सरकारकडे भूमिका मांडून नक्कीच नुकसान भरपाई देऊ असा विश्वास दिला आहे. यावेळी जिल्हा सरचिटणीस बाळ खडपे, तालुका अध्यक्ष अमोल तेली, बंड्या नारकर,अरीफ बगदादी, बाळा गावकर माजी सभापती रवी पाळेकर इत्यादी उपस्थित होते.

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

# धामापूर नळपाणी योजनेतून चिखलयुक्त पाणी पुरवठा; मालवण वासियं त्रस्त

**मालवण । वार्ताहर**

गेले दोन दिवस धामापूर नळपाणी योजनेतून मालवण वासियांना होणारा माती - चिखलयुक्त पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त बनले यासंदर्भात आज मालवण तालुका राष्ट्रीय काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मालवण नगरपालिका अधिकाऱ्यांची भेट घेऊन विचारणा केली असता येत्या दोन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत होणार असून ज्या व्यक्तीमुळे नळपाणी योजनेची पाईपलाईन फुटली गेली आहे त्याच्यावर दंडात्मक कारवाई करू अथवा त्याच्यावर फोजदारी कारवाई करण्यात येईल असे सांगितले. दरम्यान,



मालवणातील नागरिकांनी धामापूर नळपाणी योजनेचे पाणी उकळून आणि गाळून प्यावे असे आवाहन मालवण नगरपालिका प्रशासनाने केले आहे.

गेल्या दोन दिवसापासून मालवणात धामापूर नळपाणी योजनेतून चिखल आणि मातीयुक्त पाणी येऊ लागल्याने मालवणातील नळपाणी योजनाधारक त्रस्त बनले. मालवणात धामापूर नळपाणी योजनेचे जवळपास दीड हजार कनेक्शन आहेत बहुतांश नागरिकांकडे विहिरी नसल्या मुळे ते या नळपाणी योजनेच्या पाण्याचा वापर करतात. गेले दोन दिवस चिखल आणि मातीयुक्त पाणी येऊ लागल्याने संबंधित नागरिक हैराण झाले. मालवण हे पर्यटन शहर असल्याने नळपाणी योजनेचे पाणी खराब येऊ लागल्याने नागरिकांबरोबर पर्यटन व्यावसायिकांची मोठी गैरसोय झाली त्यातच शहरालगतच्या एका व्यक्ती बोअरवेल खोदत असताना त्याच्याकडून पाईपलाईन फुटल्याची चर्चा सुरु झाल्याने नागरिकांनी नगरपालिकेकडे धाव घेतली. नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मालवण तालुका राष्ट्रीय काँग्रेसने मालवण नगरपालिका अधिकाऱ्यांची भेट घेतली. विशेष म्हणजे आज शनिवार असल्याने कार्यालय बंद असतानाही काही अधिकारी कामानिमित्ताने कार्यलयात उपस्थित होते. त्यांनी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना वस्तुस्थिती कथन केली व पाईपलाईन फोडणाऱ्या त्या व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

पान ३ वर...

## खास.राहुल गांधींच्या शिक्षेच्या निषेधार्थ कणकवली तालुका काँग्रेसकडून निदर्शने !



**कणकवली । वार्ताहर**

सुरत न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. त्यानंतर देशभरातून काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. कणकवली तहसीलदार कार्यालयाबाहेर कणकवली तालुका काँग्रेसच्या वतीने निदर्शने करण्यात आली. राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. देशभरात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांचा प्रभाव वाढत आहे. त्यातून आगामी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे सरकार सत्तेवरून फेकले जाणार आहे. याची कल्पना आल्यानेच खासदार राहुल गांधींवर विविध आरोप केले जात असल्याचा आरोप कणकवली तालुका काँग्रेस कडून करण्यात आला.

यावेळी तालुकाध्यक्ष प्रदीप मांजरेकर, नागेश मोरये, अनिल डेगवेकर, प्रविण वरुणकर, अजय मोरये, संतोष टक्के, प्रदीपकुमार जाधव, अनिकेत

पान ३ वर...

## आवळेगाव येथे लागलेल्या आगीत जनावरांचा गोठा जाळून खाक





**कुडाळ । वार्ताहर**

आवळेगांवमध्ये काल भर दुपारी ११.३० वाजताच्या दरम्यान नदीकडील भागात कोणी अज्ञाताने आग लावल्याने सदर आग ही संपूर्ण जमिनीवरील करड पेटत ती आग श्री. सत्यवान कानसे यांच्या गोठ्याला लागून गोठा पूर्ण पणे जळून भस्मसात झाला व म्हैशीपण होरपळल्या! या गावातील शेतकरी श्री. सत्यवान गणपत कानसे यांच्या गोठ्याला (गुरांच्या वाड्याला) आग लागून फार मोठे नुकसान झाले आहे. या आगीत त्यांच्या सहा म्हैशी बांधलेल्या होत्या. हा आगीचा भडका पाहून आरडा ओरड झाली. परंतु दरम्यानच्या काळात त्यापैकी एक मोठी म्हैस आगीत १००% भाजल्याने मरण पावली, अन्य २ म्हैशी पण बऱ्याच भाजल्या आहेत व अन्य ३ म्हैशी ंना वाचवण्यात यश आले आहे. स्वत: सत्यवान

पान ३ वर...

## वाडातर, पडवणे, पालये सडाभागात अग्नितांडव, अतुल रावराणे यांनी केली पाहणी

**देवगड । पांडूशेठ साटम**

बागा आगीच्या भक्ष्यस्थानी, बागायतदारांचे करोडो रूपयांचे नुकसान याची पाहणी शिवसेना नेते श्री भैरी भवानी प्रतिष्ठान चे अध्यक्ष अतुल रावराणे शिवसेना देवगड उपाध्यक्ष नगरसेवक निवृत्ती उर्फ बुवा तारी ,युवासेना प्रमुख गणेश गावकर यांनी आंबा बागायतदारांसमवेत पाहणी केली यावेळी या बागायतींपरिसरतील कित्येक पशुपक्षी या आगीच्या वणव्यात होरपळुन मृत्युमुखी पडले .या वणव्यात हजारो कलमे आंबा पिकासह जळून खाक होऊन लाखो रुपयांची बागेतदारांचे नुकसान झाले असून प्रशासकीय यंत्रणेमार्फत अपेक्षित असे सहकार्य



न होता पाहणी करण्या व्यतिरिक्त रीतसर पंचयादी घातली गेली नसल्याने बागायतदारांनी नाराजी व्यक्त केली आहे.ही आग बागेम धून गेलेल्या विद्युत वाहिनी मधून ठिणगी पडून बागायती मध्ये आग लागल्याचे चर्चा ऐकू येत आहे.

या अचानक लागलेल्या आगीमध्ये वाडातर पडवणे सडाभागात असलेल्या वाडातर, पडवणे, पालये भागातील बागायतदारांच्या आंबा कलमबागा होरपळून बागायतदारांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले आहे.ही घटना शनिवारी सकाळी ११ वा.सुमारास घडली. वाऱ्यामुळे आग सर्वत्र पसरल्याने आग विझविणे बागायतदारांच्या आटोक्याबाहेर गेले यामुळे बागा आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या.ऐन हंगामात तयार झालेला आंबाही

पान ३ वर...

## बँक केव्हायसी अपडेटच्या नादात ग्राहकांना मनस्ताप

**मालवण । वार्ताहर**

बँकेत खाते असणाऱ्या ग्राहकांकडून अधून मधून खाते सुरक्षेच्या कारणास्तव केव्हायसी फॉर्म म्हणजेच ग्राहक ओळख पडताळणी फॉर्म भरून देण्याची मागणी बँकेने केल्यावर हा फॉर्म भरेपर्यंत व खाते अपडेट होई पर्यंत या खात्यावरील स्लिपद्वारे तसेच एटीएम व ऑनलाइन पद्धतीचे व्यवहार बंद ठेवले जातात. मात्र, ग्राहकांनी सदर फॉर्म भरूनही तसेच केव्हायसी अपडेट झाल्याचा संदेश प्राप्त होऊनही प्रत्यक्षात दोन तीन दिवस खात्यावरील कोणतेही व्यवहार सुरू होतं नसल्याने काही बँकांच्या खातेदारांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रकारात एटीएम मधून पैसे येत नसल्याने तसेच ऑनलाइन पेमेंटही होतं नसल्याने ग्राहकांचे महत्वाचे व्यवहार अडकून पडत आहेत.

बँकेकडून केव्हायसी अपडेट करण्याचा मॅसेज मोबाईलवर आल्यावर संबंधित बँक खात्यावरील सर्व व्यवहार बँकेकडून थांबवले जातात. याम ध्ये पैसे काढणे, एटीएम मधून पैसे काढणे तसेच ऑनलाइन पेमेंट ॲप वरील पेमेंट चे व्यवहार थांबविले जातात. बँकांमध्ये ई - केव्हायसी अपडेटची सुविधा असून यासाठी आवश्यक फॉर्म बँकेत देण्यात येतो. मात्र केव्हायसी फॉर्म भरून झाल्यावर दोन तीन काउंटर

पान ३ वर...

## सोमवारी औषधांचा प्रश्न सुटेल



**सावंतवाडी । प्रतिनिधी**

सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयातील औषधांचा प्रश्न सोमवारी सोडवण्यात येईल असे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी केसरी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. पत्रकारांनी सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत असल्याचे सांगितले. हा प्रश्न सोमवारी मार्गी लागेल असे चव्हाण यांनी सांगितले. औषधांचा तुटवडा का भासतो आहे ? हा प्रश्न आहे. हा प्रश्न निर्माण व्हायला संबधित वैद्यकीय अधीक्षक जबाबदार आहेत. औषध पुरवठा संपण्याअगोदर त्याची मागणी अधीक्षकांनी केली पाहिजे होती. तहान लागल्यावर विहीर खोदणे चुकीचे आहे.

औषध पुरवण्यासाठी आवश्यक फंड सीआर फंडातून करण्यास अनेक कंपन्या तयार आहेत. त्यामुळे असे प्रश्न का निर्माण होतात याच आश्चर्य वाटतं, असे चव्हाण म्हणाले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष संजू परब, बंटी पुरोहित उपस्थित होते.

## परशुराम घाट बंद ठेवण्याबाबतचे नियोजन येत्या दोन ते तीन दिवसात होण्याची शक्यता

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

कोकणात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम गेले कित्येक सुरू आहे. या महाम ार्गावरील परशुराम घटाबाबत मोठी माहिती हाती आली आहे. मार्गावरील चिपळूण जवळील परशुराम घाट हा २७ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात यावा अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने



या संदर्भात पोलीस प्राशासन, उपप्रादेशिक विभाग व चिपळूण महसूल विभाग यांच्याकडुन अहवाल मागवला आहे त्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे परशुराम घाट बंद ठेवण्याबाबतचे नियोजन येत्या दोन ते तीन दिवसात होण्याची शक्यता आहे.

येत्या पावसाळ्यात त्रास होऊ नये म्हणून या घाटात युद्धपातळीवरती काम सुरू आहे. परशुराम घाटात अवघड ठिकाणी काम करावे लागणार असल्याने हा घाट वाहतुकीसाठी बंद करण्याची मागणी या राष्ट्रीय महामार्ग ऍथॉरिटीकडून जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे. त्यामुळे या परिसराची पाहणी करून जिल्हा प्रशासनाकडून येत्या दोन ते तीन दिवसात या बाबतीत अंतिम निर्णय होणार आहे.

पान ३ वर...

## डेगवे-फणसवाडीच्या पुलाचे काम प्रगती पथावर

**डेगवे । वार्ताहर**

सावंतवाडी तालुक्यातील डेगवे फणसवाडी येथील जुन्या सोसायटीच्या जवळील उमाळकर यांच्या बागेतील ओहळावरिल पुल नादुरुस्त झाला होता.त्यामुळे सदरील ओहळावरिल पुलाचे फेरदुरुस्तीच्या काम तातडीने करण्याची मागणी तत्कालीन सरपंच व ग्रामपंचायतीने केली होती व ती मंजूर केली होती. त्यामुळे सदरील काम सुरू झाले असून प्रगती पथावर आहे .मात्र सदर ठिकाणी असलेल्या ओहळावरिल पुलाचे काम

पान ३ वर...



## शंभर कोटी निधीच्या कामांवरील स्थगिती उठवावी यासाठी गेलेल्या वैभव नाईक यांना मुख्यमंत्र्यांनी दिली धमकी

**कुडाळ । प्रतिनिधी**

मालवण कुडाळ मतदार संघात स्थगिती दिलेल्या शंभर कोटी निधीच्या कामांवरील स्थगिती उठवावी यासाठी आपण नवीन मुख्यमंत्र्यांना भेटलो असता त्यांनी ही कामे होणार नाहीत तुम्हाला त्रास होईल अशी धम की दिली. मात्र मी एका माजी मुख्यमंत्र्यांचा पराभव करून आमदार झालो आहे. त्यावेळीही धमक्या दिल्या गेल्या. त्यास न घाबरता प्रेरणा घेत आमदार झालो. त्यामुळे नवीन मुख्यमंत्र्यांनी दिलेली धमकी ही मला जास्त ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन आमदार वैभव नाईक यांनी मालवण येथे आपल्या वाढदिवस



कार्यक्रमात बोलताना केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे मालवण तालुक्याच्या वतीने मालवण शिवसेना शाखा येथे आज सायंकाळी आमदार वैभव नाईक यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर आमदार वैभव नाईक, तालुकाप्रमुख हरी खोबरेकर, शहरप्रमुख बाबी जोगी, माजी नगराध्यक्ष महेश कांदळगावकर, माजी नगरसेवक मंदार केणी, नितीन वाळके, महिला आघाडीच्या सेजल परब, पूनम चव्हाण, दिपा शिंदे, कोळंब सरपंच सिया धुरी, नंदू गवंडी, उमेश मांजरेकर, वायरी सरपंच भगवान लुडबे आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार नाईक म्हणाले, आव्हाने पेलण्याची ताकद तुमच्या शुभेच्छामुळे मिळते. मला घडवण्यामध्ये मालवणच्या कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे. ज्या लोकांनी निवडून दिले त्यांचा विश्वास महत्वाचा आहे. राजकारण

पान ३ वर...

## खारेपाटण मधील विकासकामांचे शिवसेनेच्यावतीने भूमिपूजन

**खारेपाटण । वार्ताहर**

जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ च्या अंतर्गत बाळासाहेबांची शिवसेना अर्थात सिंधुदुर्ग जिल्हा शिवसेना पक्षाच्या वतीने खारेपाटण शहरात मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आज खारेपाटण मध्ये जिल्हा अध्यक्ष संजय आंग्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी शिवसेना पक्षचे विधानसभा प्रमुख संदेश पटेल, कणकवली उपतालुका प्रमुख मंगेश गुरव, खारेपाटण सरपंच प्राची ईसवलकर, खारेपाटण



ग्रा.पं.सदस्य गुरूप्रसाद शिंदे, सुधाकर ढेकणे, अस्ताली पवार, जयदीप देसाई, शितीजा धुमाळे, सामाजिक कार्यकर्ते कुबल गुरू, नंदू कोरगावकर, खांडेकर, बबन तेली, सुहास राऊत, दिनेश खांडेकर, मंगेश ब्रम्हदंडे, देवानंद ईसवलकर, राजू शिंदे, प्रणय गुरसाळे, शिवाजी पाटील, सुयोग ब्रम्हदंडे, प्रा.आ. केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ.प्रिया वडाम आदी मान्यवर शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने

पान ३ वर...

# विचार-मंथन

* रंग गोरा असून चालत नाही तर मनावरील काजळी काढता आली पाहिजे.
* काळजी केल्याने 'काळ' माणसासमोर 'जी' म्हणून उभा राहातो. * चालून पाय थकायला नको म्हणून डोकं चालवतो तो खरा माणूस,
* भरवंसा व आशीर्वाद कधीही दिसत नाहीत, परंतु अशक्य गोष्टीलाही ते शक्य करतात.

## विज्ञानाचा दिवा तेवत ठेवायलाच हवा

विज्ञानाच्या वापरामुळे अनेक वाईट परिणाम होत असतात आणि पर्यावरणाचा विनाशही होत असतो. पण यासाठी वैज्ञानिकांना दोषी ठरवता येणार नाही. विशेषतः गेल्या , सत्तर वर्षात पर्यावरणाच्या विनाशांबाबतची माहिती जगाला वैज्ञानिकांनीच पुरवलीय. हा विनाश थांबवण्यासाठी काय केलं पाहिजे हे सुद्धा स्पष्टपणे सांगितलंय. पण नफ्यावर आधारित उत्पादन व्यवस्था वैज्ञानिकांच्या इशाऱ्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतात. खोट्या विज्ञानाच्या आणि अंधश्रध्देंच्या आधारे आपण नक्कीच यशस्वी होऊ शकत नाही.विज्ञानामुळेच आपण निसर्ग आणि निसर्गातल्या घटनांबाबत ज्ञान मिळवू शकतो. तसंच विज्ञान आपल्याला विचार करायची योग्य पध्दत कोणती आहे हे स्पष्ट करून देतं.महत्त्वाच्या उत्पादन क्षेत्रांवर काही थोड्या देशी आणि परदेशी व्यक्ती, संस्थांची मालकी असते. जनतेतल्या नेत्यांची काय घडतंय याचा बोध घेण्याची पात्रता नसते. लोकांना स्वतःसाठी काय योग्य आहे हेच ठरवता येत नाही किंवा सत्ताधाऱ्यांना जाब विचारणं अशक्य होतं. जनता जन्मकुंडल्यांमधे मग्न होते. त्यांची टीकात्मक राहण्याची क्षमता संपते. एखाद्या गोष्टीतून लोकांना समाधान मिळतं आणि प्रत्यक्षात वास्तव काय आहे यामधे जनता फरक करू शकत नाही. तेव्हा आपण नकळत अंधश्रद्धा आणि भयानक अंधार असलेल्या जगात सामिल होतो. जग काय आहे हे समजून घ्यायला विज्ञान बहुतांशी यशस्वी झालंय. अनेक गोष्टी समजून घेण्यात, सुरक्षितपणे मार्गक्रमण करण्यात विज्ञानाची प्रचंड मदत झालीय.

थॉमस अँडी नावाच्या शास्त्रज्ञाने ला लंडनमधे प्रसिद्ध झालेल्या आपल्या 'कँडल इन द डार्क' या पुस्तकात लिहून ठेवलंय की ज्ञान प्राप्त केलं नाही तर राष्ट्रं संपतील. टाळता येण्यासारखी दुःख अनेकदा आपल्या मूर्खपणामुळे निर्माण होत नसतात. तर उलट आपल्या अज्ञानामुळे आणि विशेषतः स्वतःबद्दलच्या अज्ञानामुळे निर्माण होत असतात.समाजातली संकटं वाढत जातात, त्यानुसार समाज अंधश्रद्ध आणि सारासार विवेकहीन होण्याचा धोका खूप मोठा होतो. आपल्या धार्मिक, जमातीय ईर्षांना टंचाईच्या काळात, परकीय आक्रमणाच्या काळात आणि कट्टर भक्तपणाच्या झंझाटात जागृत केलं जातं. तेव्हा पुरातन काळातल्या चालीरिती आणि विचारसरणी जनतेच्या मानसिकतेवर आरुढ होतात.

ज्ञान मिळवण्याचं परिपूर्ण साधन

अशा अनेक गोष्टी आहेत ज्या विज्ञानाला समजून घेता आल्या नाहीत. आपलं विश्व अनेक शेकडो कोटी प्रकाशवर्ष अंतरावर पसरलंय. म्हणून अशी स्थिती कायमची असू शकेल. आपल्याला नेहमीच आश्चर्याचे धक्के बसत असतात. असं असूनही काही धर्मांध लेखक आरोप करतात. वैज्ञानिक



असं मानतात की, त्यांना माहीतीय तेवढंच वास्तव आहे, असा त्यांचा आरोप असतो. ज्या गोष्टींचा पुरावा नाही त्या गोष्टी वैज्ञानिक नाकारतात. पण याचा अर्थ असा नाही की वैज्ञानिक त्यांचं ज्ञान परिपूर्ण आहे, असं समजतात. ज्ञान मिळवण्याचं साधन म्हणून विज्ञान परिपूर्ण नक्कीच नाही. पण आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनांपैकी ते सर्वोत्तम साधन आहे.

विज्ञान कुणासाठी धोकादायक?

विज्ञानाच्या यशाची अनेक कारणं आहेत. त्यापैकी एक हे आहे की विज्ञानामधे चूक दुरूस्त करण्यासाठी विशिष्ट यंत्रणा कार्यरत असते. आपण विज्ञानातल्या संकल्पनांची किंवा मांडणीची पडताळणी बाहेरच्या जगाशी जोडून करत असतो. यावर टीकात्मक दृष्टीने विचार करतो तेव्हा आपण विज्ञानाचा वापर करत असतो. मात्र आपण स्वमग्न होतो, टीकात्मक रहात नाही, वस्तुस्थिती आणि अपेक्षा याबद्दल गोंधळ निर्माण करतो, तेव्हा आपण खोट्या विज्ञानाला आणि अंधश्रद्धांना प्रेरणा देत असतो.शुद्ध गणिताचा अपवाद वगळता विज्ञानाच्या कुठल्याही शाखेबद्दल आपण टक्के ठाम नसतो. विज्ञानातल्या प्रमुख तत्वांपैकी एक तत्त्व असं सांगतं की 'सत्ताधाऱ्यांनी केलेल्या वक्तव्यांवर विश्वास ठेऊ नका.' काहींची नावं सोडली तर बहुतांश वैज्ञानिक या तत्त्वाचं पालन करतात. सत्ताधाऱ्यांची आणि नोकरशहांची अनेक विधानं ते खोटी ठरवतात.सत्ताधा– यांनी त्यांचं म्हणणं अन्य माणसांप्रमाणे सिद्ध करणं आवश्यक आहे. पारंपरिक शहाणपण स्वीकारायला विज्ञान अनेकदा इच्छुक नसतं. यामुळे स्वतःबद्दल टीकात्मक नसणाऱ्या आणि आमचं ज्ञान हेच अंतिम ज्ञान आहे असं मानणाऱ्या विचारधारांसाठी विज्ञान धोकादायक गोष्ट ठरते.ब्रिटनची युरोपियन संघातली 'ब्रेक्झिट' कुणाच्या फायद्याची?

विज्ञान नेहमीच नम्र असतं

काही व्यक्ती विज्ञानाला एकदम शिष्ठ आणि घमेंडखोर समजतात. विशेषतः अनेक पिढ्यांनी स्वीकारलेल्या एखाद्या तत्त्वाला किंवा संकल्पनेला विज्ञान चुकीचं आणि खोटं ठरवलं जातं. तेव्हा विज्ञान खूपच गर्विष्ठ ठरतं. भूकंपाच्या धक्क्यामुळे पायाखालची जमीन हादरुन जाते. त्याप्रमाणे ज्या श्रद्धांच्या आधारावर आपण जगत असतो त्यांना आव्हान दिल्यानंतर आपण अतिशय त्रस्त किंवा निराधार होतो. हे साहजिकच आहे.

पण खरं पाहता विज्ञान हे नेहमी नम्र राहिलंय. वैज्ञानिक त्यांच्या गरजा किंवा इच्छा निसर्गावर लादत नाही. उलट ते नम्रपणे निसर्गातले घटक तपासण्याचं काम करतात आणि विज्ञानाकडे अतिशय गांभिर्याने बघतात. अनेक मान्यवर वैज्ञानिकांच्या चुका अन्य वैज्ञानिकांनी शोधल्यात. वैज्ञानिकांना मानवी मर्यादांची जाणीव असते.वैज्ञानिक कुठल्याही नवीन मांडणीची तपासणी स्वतंत्रपणे आणि शक्य असल्यास संख्यात्मक दृष्टीने करतात. ते त्या नवीन मांडणीबद्दल पर्यायी मांडणी उपलब्ध करण्याचं प्रयत्न करतात. वैज्ञानिक जेव्हा एखादी मांडणी चुकीची आहे हे खात्रीशीरपणे सिद्ध करतात, तेव्हा त्याची दखल सर्वोच्च पातळीवर घेतली जाते.

विज्ञानाचा दुरूपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी अनेक उत्तम उदाहरणांपैकी एकच उदाहरण आपल्या समोर आहे. न्यूटन या महान वैज्ञानिकानं वर्षांपूर्वी गतीचे नियम आणि गुरूत्वाकर्षणाचा व्यस्त वर्गाचा नियमाबद्दल मांडणी केली. या नियमांचा वापर व्यवहारात अनेक उद्दिष्टांसाठी केला जातो. त्यापैकी एक उपयोग भविष्यातल्या ग्रहणांबाबत अचूक माहिती मिळवण्यासाठी होत असतो. अनेक वर्षांनंतर आणि शेकडो कोटी मैल अंतर पार पाडल्यानंतर पृथ्वीवरून पाठवलेलं अंतराळायान अपेक्षित ग्रहाच्या कक्षेत कधी पोचणार हे न्यूटनच्या शोधाचा उपयोग करून सांगू शकतो.आईनस्टाईन या नंतरच्या महान वैज्ञानिकाने एका विशिष्ट परिस्थितीत न्यूटनचे नियम लागू होत नाहीत हे शोधलं. न्यूटनच्या नियमांत सुधारणा केली. अशी विशिष्ट परिस्थिती कमी वेळा येते ही बाब अलाहिदा. पण महान शास्त्रज्ञ न्यूटन यांनी खूप अचुकतेनं आपले नियम शोधून काढले.विज्ञानाच्या वापरामुळे अनेक वाईट परिणाम होत असतात आणि पर्यावरणाचा विनाशही होत असतो. पण यासाठी वैज्ञानिकांना दोषी ठरवता येत नाही. समाजातले काही भाग विज्ञानाचा दुरूपयोग स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी जाणीवपूर्वक करतात. याचा दोष विज्ञानाला देणं चुकीचं आहे. विशेषतः गेल्या – वर्षातल्या पर्यावरणाच्या विनाशाबाबत जगाला माहिती वैज्ञानिकांनीच पुरवली. हा विनाश रोखण्यासाठी काय केलं पाहिजे हेही स्पष्टपणे सांगितलंय. पण नफ्यावर आधारित उत्पादन व्यवस्था वैज्ञानिकांच्या इशाऱ्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करते. खोट्या विज्ञानाच्या आणि अंधश्रध्देच्या आधारे आपण नक्कीच यशस्वी होऊ शकत नाही.

## तेजस्वी सूर्य पृथ्वीवर पुन्हा तळपेल

२०२० ते २०२२ हे वर्ष कसं गेलं, असं कुणी विचारलं तर अगदी जगातील प्रत्येकाकडून उत्तर येईल 'गेलं कसं तरी!' त्याचं कोविड कारण सर्वांनाच ठाऊक आहे. आपल्या देशात याची गडद छाया दिवसेंदिवस कमी होत असून आरोग्याचा तेजस्वी सूर्य पृथ्वीवर पुन्हा तळपेल अशी चिन्हे नववर्षाच्या आरंभी दिसतायत. तिकडे युरोप, अमेरिकेत मात्र परिस्थिती अजूनही बिकट आहे. चिकट कोरोना त्यांची पाठ सोडायला काही तयार नाही;

परंतु सभोवतीची सारी माणसं, सारा परिसर, अवघा देश आणि संपूर्ण जग जेव्हा सुखी असतं तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकतो याचा साक्षात्कार सरत्या वर्षाने अकल्पितपणे करून दिला. तोपर्यंत जग 'ग्लोबलायझेशन'ने आणलेल्या ऐहिक सुखांमध्ये मशगूल होते. मात्र कोविडच्या 'ग्लोबलायझेशन'ने सारेच हबकले. त्याची वेदना आणि दुःख जागतिक झाले. आता यापुढच्या काळात जगातील प्रत्येक व्यक्ती सुखी होवो अशी इच्छा व्यक्त करूया. प्रसिद्ध कवयित्री अमृत प्रीतम यांनी एका कवितेत 'बदनसीबीयों का मौसम बदल जाए।' तो जीवघेणा मौसम बदलावा आणि जगाने आनंद ऋतूचा अनुभव घ्यावा यासाठी शुभचिंतन!




नव्या दुसऱ्या सहस्रकाची सांगता होऊन तिसरं 'मिलेनियम सुरू झालं तेव्हा जन्मलेली पिढी आता तारुण्यात प्रवेश करतेय. त्यांच्या दृष्टीने नववर्षाचा हर्षोल्हास महत्त्वाचा असणारच. परंतु गेल्या वर्षीच्या मार्चपासून सारेच सण, सोहळे 'जरा बेतानं बरं का' अशा पद्धतीने साजरे करावे लागले. जल्लोषाचे पारंपरिक बेत मनातल्या मनातच विरले. एकूणच दैनंदिन व्यवहारावर अनेक बंधनं आली, पण जिवावर बेतण्यापेक्षा काही बेत काही काळापुरते रद्द करणे यातच सूज्ञपणा होता. आपल्या देशातल्या एकशेतीस कोटींच्या लोकसंख्येने ते नियम पाळले.

मुंबईतला धारावीमधील गर्दीच्या वस्तीतून कोविडचं उच्चाटन ज्या नियोजनाने घडलं त्याचं जगभर कौतुक झालं. हळूहळू एकेक व्यवहार परस्परातील अंतर पाळून आणि मास्क वापरून सुरु झाले; पण कोविड वैऱ्याची रात्र जोपर्यंत पूर्णतया विरून जात नाही तोपर्यंत सरकारी आणि प्रशासकीय सूचनांचं पालन करणं नागरिक म्हणून सर्वांचंच कर्तव्य आहे. कोविडचा अंदाज घेऊन कदाचित या वर्षारंभी मुंबईची लोकल ट्रेन सुरूही होऊ शकेल. महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी पुन्हा पूर्वीची गती घेईल. तो क्षण लवकर अनुभवण्यासाठी शुभचिंतन!गेल्या वर्षाने जगभरच्या अनेक हातांचं काम आकस्मिकपणे काढून घेतलं. संपन्न देशातले कोट्यवधी बेकारीच्या खाईत लोटले गेले. आपला देश तर विकसनशील. इथल्या रोजंदारीवर जगणाऱ्यांना या कठीण काळाने दिलेला तडाखा पाहिला की काळजात कालवाकालव होते. विविध क्षेत्रांत छोटी छोटी कामं करून आपला उदरनिर्वाह करत संसाराचा गाडा कसाबसा चालवणाऱ्यांची अक्षरशः दैना झाली. त्यातच जो देश आजही मोठ्या प्रमाणवर शेतीप्रधान आहे, तिथल्या बळीराजावर निसर्गाने एकामागून एक संकटं आणली.

कधी 'निसर्ग' वादळ तर कधी अवकाळी पावसाचा कहर आणि कुठे गारपीट रुजवलेली उभी पिकं डोळ्यादेखत नष्ट होताना पाहावं लागणं हे सर्वस्व हिरावून घेण्यासारखं, पण निसर्गाच्या लहरीपुढे कोणाचे काय चालणार? मात्र नियोजनबद्ध प्रयत्नातून यावर मात करताना पुढच्या काळातील हवापाण्याचा विचार करूनच पुढे जावं लागेल. पुढच्या कृषी ऋतूमध्ये शेतकऱ्याला सुगीचे दिवस दिसोत यासाठी शुभचिंतन!

हवामानाचा विषय निघाला की अमेरिकेत प्रतिवर्षी पेटणारं ॲमेझॉनचं जंगल, अनेक देशांत येणारे प्रलयंकारी महापूर आणि समुद्रात उसळणारी, आपल्याही देशाच्या मुख्यत्वे पूर्व किनाऱ्यावर धडकणारी वेगवेगळ्या नावांची चक्रीवादळं याचं भयावह स्मरण होतं. या सर्व गोष्टींचे नैसर्गिक संकेत वेळीच लक्षात घेऊन प्लॅस्टिकबंदीसह अनेक पर्यावरणसंवर्धक उपक्रम आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले पाहिजेत. 'सुखावह वाटणाऱ्या गोष्टी कालांतराने त्रासदायक ठरत असतील तर त्यांचा आधीच प्रयत्नपूर्वक त्याग करायला हवा. त्यातूनच रचनात्मक प्रगती साध्य करता येईल. त्यासाठी शुभचिंतन!

तसं पाहिलं तर आपलं मराठी नववर्ष गुढीपाडव्याला सुरू होतं, पण गेल्या दोनशे वर्षांत युरोपीय कॅलेंडरचा जगात झालेला प्रसार आणि त्यातून निर्माण झालेल्या व्यावहारिक रूढींमुळे आपण रोजच्या जीवनात 'ग्रेगरियन' कॅलेंडरच वापरतो. म्हणूनच १ जानेवारीला नवे वर्ष साजरे करतो. गतवर्षाने काय दिले आणि आपण काय गमावले याचा ताळेबंद आता मनात ठेवावा लागेल. नव्या काळाला नव्या उमेदीने सामोरे जावे लागेल. 'फिनिक्स' पक्ष्यासारखी राखेतून भरारी घ्यावी लागेल. माणसाची ही विजिगिषु वृत्ती अजेय असल्याचं काळाच्या ओघात वारंवार सिद्ध झालंय. तीच जिद्द दाखवली तर ज्ञानेश्वरांच्या शब्दांत दुरितांचे तिमिर नष्ट होईल. त्यासाठीही शुभचिंतन!

## ऑनलाईन मुलाखत द्यायला जाताय?



सध्या लॉकडाऊनच्या काळात अनेक कंपन्यांचे कामकाज ऑनलाईन सुरु आहे. सगळेच नाही मात्र निम्मे कर्मचारी घरुन काम करताना दिसत आहेत. या काळात अनेकांना आपली नोकरी गमवावी लागली तर अनेकांना नव्या नोकरीची संधी मिळाली. या नव्या नोकरीच्या किंवा प्रत्येकच नोकरी मिळवण्याचा पहिला टप्पा म्हणजे मुलाखत. लॉकडाऊनमुळे संपर्क टाळण्यासाठी अनेक कंपन्यांनी त्यांच्या नव्या कर्मचाऱ्यांच्या मुलाखती ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला आहे. तर ही नव्या पद्धतीची मुलाखत देण्यासाठी आपली तयारी असायला हवी.

तुमचा सीव्ही कितीही चांगला असला तरी तुमची कार्यक्षमता पडताळून पाहण्यासाठी अनेक लहान लहान ट्रिक्स मुलाखतकार वापरतात. त्यात तुमची काम करण्याची खरंच इच्छा आहेका?हे प्रकर्षाने तपासून पाहतात. त्यामुळे तुम्ही त्या कंपनीबाबती सगळी माहिती निदान वाचून ठेवावी. कंपनीचे प्रेगेक्ट्स, कंपनीला मिळालेले पुरस्कार त्यांच्या बेवसाईटवरुन वाचून घ्यावी.

मुलाखत देताना प्रश्न विचारणं हे तुम्ही ती नोकरी करण्यासाठी प्रमाणिकपणे प्रयत्न करत आहात. हे दाखवण्याचा सोपा मार्ग आहे. त्यामुळे संवादच नाही तर संभाषणात्मक मुलाखत देण्याचा प्रयत्न करा.मुलाखत देताना तुमचं पहिलं इंप्रेशन प्रचंड गोष्टी नमुद करुन जातं. त्यामुळे तुमचा पेहराव हा नॉर्मल असावा. जास्तीत जास्त भडक कपडे परिधान करु नये.

तुम्ही ऑनलाईन मुलाखत देताना तुमचा कॅमेरा अँगल चेक करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे तुमच्या डोळ्याच्या रेषेच कॅमेरा फीट केलेला असावा. अन्यथा तुमची बॉडीलँग्वेजवर त्याचा परिणाम होईल आणि मुलाखतकाराला चुकीचा संदेश जाऊ शकतो.

शेवटची आणि महत्वाची गोष्ट, तुम्ही कॅमेऱ्यात नीट दिसत आहात की नाही, तुमचा आवाज नीट समोरच्या व्यक्तीला जातो आहे की नाही हे तपासून पाहणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे यानंतर मुलाखतीसाठी तयारी करताना या बारिकसारीक गोष्टीचं पालन नक्की करा.

## कोरोना काळात मानसिक ताणतणावाचं नियोजन कसं करायचं?

कोरोनाच्या साथीचे परिणाम आणि दुष्परिणाम पुढेही सगळ्याच क्षेत्रात अनुभवावे लागतील. आताच आपला कम्फर्ट झोन नाहीसा झालाय. एकप्रकारची हतबलता आणि भीती सगळीकडे आहे. पुढे नेमकं काय होणार, आयुष्य कसं असणार, असे विचार सतत मनात येतात.

ज्यांना अस्वस्थतेचे, नैराश्याचे आजार आहेत त्यांचे आजार वाढतायंत. ज्यांना नाहीत त्यांच्यात ते निर्माण होतायंत. होत राहतील. या परिस्थितीत सकारात्मक, आनंदी दृष्टिकोनच आपल्याला आणि लहान मुलांसह तरुण पिढीला सक्षम बनवेल. आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आपलं सुखी आणि आनंदी असणं ठरवतो. दोन काळ्याकुट्ट रात्रींमधे एक दिवस असतो, असा एखाद्याचा दृष्टिकोन असू शकतो आणि दोन दिवसांमधे एक रात्र असते. ती संपली की पुन्हा एक स्वच्छ लखलखीत, सोनसळसळीत दिवस असणारच आहे, असंही कुणी म्हणत असतं. असं म्हणणाऱ्याचा दृष्टिकोन आनंदी, सकस, सकारात्मक ठरेल. हीच गोष्ट कुठल्याही गोष्टीकडे पाहण्यासाठी आणि आनंदाने राहण्यासाठी आवश्यक असते.

**अस्वस्थतेच्या आजारांमधे वाढ**

आताची सर्वार्थानं कठीण अशी कोरोना वायरसच्या साथीची परिस्थिती आणि त्यानंतरचा भविष्यकाळ याचं सावट, मळभ मनात दाटून येणं स्वाभाविक आहे; पण ही वेळही जाईल. आकाश स्वच्छ होईल. हाच सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला सध्याच्या कोरोनाच्या काळात ठेवावा लागणार आहे. इतकंच नाही, तर लहान मुलांमधे रुजवावा लागणार आहे.

कोरोनाच्या महाभयानक साथीचे परिणाम आणि दुष्परिणाम ही साथ चालू असताना आणि पुढेही व्यक्तिगत, आर्थिक, सामाजिक, सगळ्याच क्षेत्रांत अनुभवावे लागणार आहेत.आताच आपला कम्फर्ट झोन नाहीसा झालाय. एकप्रकारची हतबलता आणि भीती सगळीकडे आहे. पुढे नेमकं काय होणार, आयुष्य कसं असणार, असे विचार सतत मनात येतात. ज्यांना अस्वस्थतेचे, नैराश्याचे आजार आहेत त्यांचे आजार वाढताहेत. ज्यांना नाहीत त्यांच्यात ते निर्माण होताहेत. होत राहतील. या परिस्थितीत सकारात्मक, आनंदी दृष्टिकोनच आपल्याला आणि लहान मुलांसह तरुण पिढीला सक्षम बनवेल.

हांस सेले या विचारवंताचं एक छान वाक्य आहे. . आणि ते अगदी खरं आहे. आज नकारात्मक तणाव नियोजनाची नितांत गरज भासू लागलीय. हल्ली कॉर्पोरेट, मीडिया, कॉलेजचे विद्यार्थी आणि सर्वच क्षेत्रांमधे ताणतणावाचं नियोजन न करता आल्यामुळे अस्वस्थतेच्या आजारांमधे मोठ्या प्रमाणावर वाढ होतेय.


**ताणतणावाचे स्रोत वेगवेगळे**

प्रत्येक व्यक्तीची स्वभावाची जडणघडण, तणाव पेलण्याची क्षमता, परिस्थितीला रियाक्ट होण्याची पद्धत, भावनिक समतोल वेगळा असतो. त्यामुळे ताणतणावाची शारीरिक आणि मानसिक दुष्परिणामांची तीव्रता वेगळी असू शकते; पण शेवटी तणावांमुळे शरीरात होणाऱ्या , आणि इतर घातक संप्रेरकांचे दुष्परिणाम होतातच. त्याचबरोबर मेंदूतील आणि या मधे असंतुलन निर्माण होतं. ज्यामुळे अस्वस्थतेच्या आजाराला निमंत्रण मिळतं.

याची शारीरिक, मानसिक आणि वर्तणुकीतील लक्षणं दिसायला लागतात, ज्याची नोंद वेळेवर घेणं गरजेचं असतं. बदलत्या समाजव्यवस्थेमधे व्यक्तींवर अपरिमित ताणतणाव असतात. या ताणाचे स्रोत विविध प्रकारचे असतात. व्यक्तिगत, कौटुंबिक, कॉलेजअंतर्गतचे, डिपार्टमेंटअंतर्गतचे, राजकीय, सामाजिक आणि समाजव्यवस्थेचे. त्यातच अनियमित ड्युटीच्या वेळा, जेवणाच्या वेळा, अभ्यासाच्या वेळा, सबमिशन्सच्या वेळा, जागरणे, सततची जागरूक राहण्याची मेंदूची सवय आणि ताणाचा निचरा व्यवस्थित न होणं हे प्रश्न असतात. या ताणाचे परिणाम प्रत्येक व्यक्तीनुसार वेगवेगळे असतात.

**ताणाचे परिणाम प्रत्येक व्यक्तीनुसार**

वेगवेगळ्या व्यक्तींमधे वेगवेगळ्या कारणांमुळे ताण निर्माण होतो. या ताणामुळे जी अस्वस्थता निर्माण होत राहते त्याचे परिणाम शरीर आणि मनावर निश्चितपणे होतात. वेळीच जर यावर उपाय झाले नाहीत, तर वेगवेगळे शारीरिक, मानसिक आजार होतात. सततच्या अस्वस्थतेमुळे वाटणारी सुरवातीची शारीरिक आणि मानसिक लक्षणं असतात.



ही लक्षणं म्हणजे सतत अस्वस्थ वाटत राहणं, लहानसहान कारणांवरून होणारी चिडचिड, राग अनावर होणं, झोप न येणं किंवा जास्ती येणं, अनामिक भीती वाटत राहणं, भूक न लागणं किंवा अतिभूक लागणं, विनाकारण संशय येणं, एकाग्रता न होणं, विचारांमधे गोंधळ आणि निर्णय घेता न येणं, विलक्षण थकवा वाटणं, वारंवार पोट बिघडणं, निराश वाटत राहणं, आत्मविश्वास कमी होणं, जगण्यातला आनंद कमी होणं इत्यादी.

या आणि अशा लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास नैराश्याचा आजार किंवा एखादा शारीरिक आजार होऊ शकतो. आणि इतर ताणतणावाशी निगडित संप्रेरके अतिरिक्त प्रमाणात स्रवतात व त्यामुळे इतर शारीरिक अवयवांच्या वर विपरीत परिणाम होतो. त्यातून अतिरक्तदाब, हृदयविकार, पचनसंस्थेसंबंधातले विकार व अनेक आजार उद्भवू शकतात. या शास्त्र शाखेच्या निष्कर्षांनुसार बहुतेक शारीरिक आजारांचं मूळ हे खूप काळ सहन केलेल्या मानसिक ताणतणावात असतं. तसंच या सर्व लक्षणांची परिणती कार्यक्षमता कमी होणं, व्यसनाधीनता वाढणं, गैरहजेरी वाढणं इत्यादी गोष्टींमधे होते.

**ताणतणावाचं नियोजन कसं करायचं**

कणखर; पण शांत, स्वस्थ मन:स्थिती निर्माण करता येईल का? त्यासाठी काय करावं लागेल? त्यासाठी पुढील पायऱ्यांमधे काम करावं लागेल. आवश्यक वाटल्यास तज्ज्ञांची मदत घ्यावी लागेल.

ताण समजून घेणं आणि त्यांची नोंद करणं – आपल्यावर सध्या कुठले ताण आहेत? कुठल्या गोष्टींची काळजी वाटत राहते? कसली भीती वाटते? कशामुळे राग येतो? तो ताब्यात राहतो का? कशामुळे वाईट वाटतं? कुठला अपराधगंड वाटत राहतो का? शारीरिक आणि मानसिक अस्वास्थ्याची लक्षणं, अशा अनेक गोष्टींची नोंद करावी. थोडक्यात, हे एकप्रकारचं भावनांचं ऑडिट असेल. तज्ज्ञांच्या मदतीने त्यावरचे उपाय शोधावेत. तज्ज्ञांशी बोलल्यामुळे ताणाचा निचरा व्हायला मदत होईल.

उपाययोजना आणि आवश्यक असल्यास औषधोपचार, थेरपीज – एकदा तणावाचे मूळ तसंच अस्वस्थतेच्या आजाराचं स्वरूप लक्षात आलं की, तज्ज्ञांनी सुचवलेली औषधे घेणं आणि आवश्यक सायकोथेरपी, समुपदेशन, तणाव नियंत्रणाची, मन:स्वास्थ्याची तंत्र शिकणं आणि या सर्वांचा विशिष्ट कालावधीपर्यंत उपयोग करणे महत्त्वाचे आहे.

व्यायाम, योगासनं, प्राणायाम, ध्यान आणि वर्तमान क्षणात राहण्याची तंत्र, रोज चल पद्धतीचा व्यायाम म्हणजे वेगात चालणं, धावणं, पोहोणं, इत्यादी. यामुळे शरीरात , तसंच इतर नैसर्गिक स्रवतील. तसंच प्राणायाम, ध्यानाच्या काही पद्धती, श्वासावर आधारित ध्यान, वर्तमान क्षणात राहण्याची तंत्र शिकून घेणं.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

## धामापूर नळपाणी योजनेतून चिखलयुक्त पाणी पुरवठा; मालवण वासिय त्रस्त

यावेळी प्रांतिक सदस्य साईनाथ चव्हाण, अरविंद मोडकर, तालुकाध्यक्ष मेघनाद धुरी, सरचिटणीस महेंद्र मांजरेकर, शहर चिटणीस श्रेयस माणगावकर, लक्ष्मीकांत परुळेकर, देवानंद लुडबे, किशोर नाचणोलकर, संदीप परब, पराग माणगावकर, मेघः श्याम लुडबे, उपाध्यक्ष हेमंत माळकर, ओबीसी जिल्हाध्यक्ष महेश अंधारी, लुईस मेंडीस, मधुकर लुडबे, योगेश्वर कुर्ले, आप्पा चव्हाण, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष सरदार ताजर, समीर आगणे आदी उपस्थित होते. दरम्यान, नागरिकांनी नळपाणी पुरवठा योजनेतून येणारे पाणी उकळून व गाळून प्यावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## खास.राहुल गांधींच्या शिक्षेच्या निषेधार्थ कणकवली तालुका काँग्रेसकडून निदर्शने !

दहीबावकर, महादेव दहीबावकर, अमित मांडवकर, रुपेश साळुंखे, देवेंद्र दहीबावकर,साईनाथ दहीबावकर, गजानन मोरये, निलेश दहीबावकर,संदीप कदम, पंढरीनाथ पांगम आदी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रदीप मांजरेकर म्हणाले, खटले दाखल करून त्यांना लोकसभेतून अपात्र करण्याचे षडयंत्र मोदी सरकार व भाजपने रचले आहे. सुरत सत्र न्यायाल्याचा निकाल हा त्यातीलच एक भाग असल्याचा आरोप काँग्रेसकडून होत आहे. मात्र, यामुळे आता देशातील काँग्रेस कार्यकर्ते पेटून उठले आहेत. आज याचा निषेध म्हणून कणकवली तालुका काँग्रेसच्या वतीने कणकवली तहसीलदार कार्यालया बाहेर निदर्शने करण्यात आली. राहुल गांधी यांना गुजरात न्यायालयाने दोन वर्ष तुरुंवावासाची शिक्षा केली आहे. कर्नाटक च्या विधानसभा निवडणुकीत निरव मोदी ललीत मोदी सारखे सगळेच मोदी चोर कसे? या विधानावर न्यायालय एवढी शिक्षा कशी काय करु शकते याचा अर्थ मोदी देशात हिटलर शाही आणु पहात आहे. राहुल गांधींची भारत जोडो यात्रेनंतर वाढलेली लोकप्रियता तसेच अडाणी प्रकरणात संसदेत जेपीसी चौकशीची केलेली मागणी यामुळे मोदी व भाजप कुठेतरी अडचणीत येणार आहे त्यामुळे दोन वर्षाची शिक्षा करुन त्यांच संसदेतल सदस्यत्व रद्द करून विरोधी आवाज बंद करण्याचा हा डाव आहे. परंतु राहुल गांधी आणि कॉग्रेस या सर्वाला पुरुन उरेल व भाजप व मोदींचा हिटलरवादी बुरखा फाडेल. या साठी कणकवली तालुका काँग्रेस तर्फे तहसीलदार कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आल्याचे सांगत केंद्रसरकारचा निषेध करण्यात आल्याचे त्यांनी सांगीतले.

## आवळेगाव येथे लागलेल्या आगीत जनावरांचा गोठा जाळून खाक

यांनी लागलीच जीवाची पर्वा न करता गोठ्यात शिरून म्हैशींची दावी तोडून वाचवल्या! यावेळी काहीनी संबंधित अधिकारी वर्गांना मोबाईल वरून कल्पना दिल्या वर सौ. पूर्वा सावंत.सरपंच, उप सरपंच श्री. विवेक कुपेरकर, मा. श्री. विजय चव्हाण बिडिओ साहेब, तसेच पशुवैद्यकीय अधिकारी श्री. देसाई साहेब, मा. श्री. दादा साईल,कुडाळ तालुका भाजपा अध्यक्ष, देवेंद्र सामंत, मंडल सरचिटणीस व गावांतील श्री. विजय पवार, श्री. चंद्रहास सावंत, , श्री. अमित तावडे, श्री. आबा सावंत, श्री.महादेव सावंत व ईतर सर्व जवळ जवळ अर्धा गांव गोळा झाला.प्रत्यक्ष दर्शनी हे दृश्य पहाता फार हळ हळ व्यक्त होत होती. या सर्वां समक्ष उपस्थित अधिकारी यांनी पंचनामा करण्या बाबत सरपंच,उप सरपंच यांना मार्गदर्शन पर सुचना दिल्या!

## वाडातर, पडवणे, पालये सडाभागात अग्नितांडव, अतुल रावराणे यांनी केली पाहणी

होरपळून गेल्याने बागायतदारांवर आस्मानी संकट कोसळले. वाडातर, पडवणे सडाभागात शनिवारी सकाळी अचानक आग लागली.वाऱ्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले.वारयासारखी आग पसरली व होत्याचे नव्हते झाले. यामध्ये आंबा कलमे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने बागायतदारांचे करोडो रूपयांचे नुकसान झाले.

यामध्ये वाडातर येथिल दत्तात्रय वाडेकर, काका ढोके, अजित ढोके, विलास ढोके, सुनिल फडके, राजाराम भाबल, धुरी, कृष्णा जुवाटकर, विनायक जुवाटकर, पडवणे येथील देवदत्त सुर्यकांत जाधव, देवगडमधील प्रसाद मांजरेकर तसेच पालये येथील बागायतदारांच्या बागा, कलमे आगीत होरपळली.यामध्ये कलम ांवर तयार झालेले आंबा पीकही आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.आहे.

## बँक केव्हायसी अपडेटच्या नादात ग्राहकांना मनस्ताप

फिरल्यावर मॅनेजरांकडेही पाठवले जाते. केव्हायसी अपडेट सारख्या छोट्या कामासाठी ग्राहकांना मॅनेजरना भेटावे लागते. फॉर्म जमा केल्यावर काही तासांनी मोबाईलवर केव्हायसी अपडेट झाल्याचा मॅसेज येतो. मात्र यानंतर ग्राहकाला आपले व्यवहार पुन्हा सुरू होण्याची अशा असतानाच पुढील दोन दिवस तरी त्या खात्यावरील बँक व्यवहार बंद राहिल्याचा अनुभव अनेकांना येत आहे. यामुळे या दरम्यान बँकेतून पैसे काढता येत नसल्याने किंवा ऑनलाईन पेमेंटही होत नसल्याने ग्राहकांचे आर्थिक व्यवहार ठप्प होऊन त्यांना मनस्ताप होत आहे. केव्हायसी अपडेट झाल्यावर लवकरात लवकर बँक खात्यावरील व्यवहार सुरू व्हावेत, अशी मागणी ग्राहकांमधून होतं आहे.

## खारेपाटण मधील विकासकामांचे शिवसेनेच्यावतीने भूमिपूजन

उपस्थिती होते. बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या वतीने खारेपाटण मंजूर करण्यात आलेली विकास कामे पुढील प्रमाणे - १) देव कालभैरव मंदिर मार्गे खारेपाटण बाजारपेठकडे जाणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे (एकूण ४ लाख रुपये) २) खारेपाटण हायवे सर्व्हिस रोड ते प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे (एकूण ३ लाख रुपये ) ३) कोंडवाडी पाण्याची टाकी ते खांडेकर घरापर्यंत जाणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे ( एकूण ४ लाख रुपये ) ४) मुलाणी घर ते कुबल गुरूजी घराकडे जाणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.(एकूण १ लाख रुपये ) वरील सर्व विविध विकास कामांचा शुभारंभ आज खारेपाटण येथे शिवसेना जिल्हा अध्यक्ष संजय आंग्रे यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब,सिंधू रत्न योजना महाराष्ट्र राज्य संचालक किरण उर्फ भैया शेठ सामंत,पक्षाचे नेते माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत,जिल्हा प्रमुख संजय आंग्रे यांच्या माध्यमातून व प्रयत्नातून खारेपाटण मध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे.यापुढेही विविध विकासकामे आमच्या शिवसेना पक्षच्या वतीने खारेपाटण शहरात व खारेपाटण - तळेरे विभागात करण्यात येणार असल्याचे शिवसेना पक्षाचे कणकवली उपतालुका प्रमुख मंगेश गुरव यांनी यावेळी सांगितले.

# पर्यटन व्यावसायिकांची मालवण तहसील कार्यालयावर धडक

**मालवण । वार्ताहर**

महाराष्ट्र महसूली अधिनियम तरतूद नुसार पर्यटन व्यावसायिकांकडून अवास्तव आकारण्यात येणाऱ्या दंडास स्थगिती देण्यात यावी. अशी आक्रमक मागणी कोकण पर्यटन व्यावसायिक महासंघ व तारकर्ली पर्यटन विकास संस्थेच्या वतीने मालवण महसूल प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

मोठ्या संख्येने पर्यटन व्यावसायिकानी एकत्र येत मालवण तहसील कार्यालयावर सोमवारी धडक दिली. पर्यटन व्यावसायिक यांच्यावतीने बाबा मोंडकर सहदेव साळगावकर यांनी नायब तहसीलदार गंगाराम कोकरे, आनंद मालवणकर यांना निवेदन दिले.

यावेळी अध्यक्ष बाबा मोंडकर, अध्यक्ष सहदेव साळगावकर यांच्यासह केदार झाड, दादा वेंगुर्लेकर, मिलिंद झाड, प्रफुल्ल मांजरेकर, मनोज खोबरेकर, रामचंद्र चोपडेकर, दर्शन वेंगुर्लेकर, रुपेश सातार्डेकर, अभय





पाटकर, मिथिलेश मिठबावकर, मंदार गोवेकर, श्रेयस झांटये, नमिता गांवकर, स्नेहा सरमळकर, करुणा हट्टीकर, संगीता हट्टीकर, दीप्ती तारी, राजेश गोसावी, दिपक सामंत, मनोज हिंदळेकर, एस. के. वायंगणकर तसेच अन्य पर्यटन व्यावसायिक मोठ्या संख्येने एकजुटीने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, सागरी किनारपट्टीवर राहणाऱ्या नागरिकांनी आपल्या राहत्या घरांच्या मोकळ्या खोल्यामध्ये न्याहरी निवास, कृषी पर्यटन, होम स्टेच्या माध्यमातून राहत्या जागेत जोडधंदा म्हणून पर्यटन व्यवसाय करत आहेत. वर्षाला जेमतेम ८० ते १२० दिवस पर्यटन व्यवसाय होत असतो. त्यामुळे महसूली अधिनियमाचा वापर करून ३६५ दिवसांची दंड वसुली करणे पूर्णपूणे चुकीचे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून राज्य व केंद्र सरकारकडे मान्यता दिल्यामुळे पर्यटन व्यावसायिकांसाठी स्वतंत्र महसूली अधिनियम राबविणे, सागरी पर्यटन हंगाम जेमतेम ८० ते १२० असल्याने ३६५ दिवसाची कर दंड आकारणी चुकीची आहे.

त्यामध्ये शासकीय पातळीवर बदल करण्यात यावा. महसूली अधिनियमाचा वापर करून लावण्यात येणारा दंड पर्यटन व्यावसायिकांसाठी अधिकृत महसूली अधिनियम अस्तित्वात येईपर्यत दर दिवसासाठी आकारण्यात येणाऱ्या दंडास स्थगिती देण्यात यावी. असे निवेदनात म्हटले आहे.

तारकर्ली पर्यटन विकास संस्थेच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, शासननिर्मित पर्यटन धोरण २००६ नुसार पर्यटनवाढीसाठी तारकर्ली, वायरी, देवबागमधील स्थानिकांनी रोजगार निर्मिती करून पर्यटनात्मक विकासासाठी हातभार लावला आहे.

सीआरझेड कायद्यामुळे स्थानिकांना वाणिज्य परवाने शासनाकडून उपलब्ध होत नाहीत. अशी बांधकामे अवैध ठरवून त्यावर दंड आकारून कारवाईच्या नोटीसा पाठवलेल्या आहेत. एकीकडे मुंबईसारख्या सीआरझेड क्षेत्रातील २००० पर्यंतच्या झोपड्या शासनास वैध ठरवते व सिंधुदुर्ग या पर्यटन जिल्ह्यातील पर्यटन व्यावसायिकांना सीआरझेड कायद्यात अवैध ठरवते हा दुजाभाव आहे.

पर्यटन व्यावसायिक जमिनीचा अकृषक शेतसारा भरायला तयार आहोत परंतु दर दिवशी १०० रूपये प्रमाणे लावलेला दंड अन्यायकारक आहे. तो रद्द करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे. बाबा मोंडकर, सहदेव साळगावकर व अन्य पर्यटन व्यावसायिक यांनी भूमिका मांडली.

# परशुराम घाट बंद ठेवण्याबाबतचे नियोजन येत्या दोन ते तीन दिवसात होण्याची शक्यता

पान १ वरून..

हा घाट नेमका कोणत्या दिवशी व किती वेळ कसा बंद करायचा याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नसून येत्या दोन तीन दिवसात हा याबाबत जिल्हाप्रशासनाकडून लवकरच हा निर्णय घेतला जाणार आहे. परशुराम घाटात १.२० कि.मी लांबी ही उंच डोंगर रांगा खोल दऱ्या असल्याकारणाने चौपदरीकरणाचे काम करण्यासाठी हा भाग अवघड स्वरुपाचा आहे. उर्वरीत १०० मीटर लांबीतील काम हे अवघड स्वरूपाचे आहे या मार्गात सुमारे २५ मीटर उंचीपर्यंत डोंगराचे खोदकाम असल्याने सदर भागामध्ये चार टप्प्यांमध्ये खोदकाम करण्यात येत असून त्यापैकी तीन टप्प्यातील खोदकाम पूर्ण झाले आहे. उर्वरीत चौथ्या टप्प्याचे काम प्रगतीत आहे. उर्वरीत १०० मीटर मधील चौथ्या टप्याचे काम हे अवघड स्वरुपाचे आहे. सदर ठिकाणी काम करताना घाटातील दगड अथवा डोंगरावरील विखुरलेली माती खाली कार्यरत महामार्गावर येऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर सदर प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या में.कशेडी परशुराम हायवे प्रा.ली.यांनी या ठिकाणाच्या कामासाठी परशुराम घाट वाहतूकीसाठी दि. २७ मार्च २०२३ ते दिनांक ०३ एप्रिल २३ या कालावधीत ठेवणे बाबत विनंती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम हे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यासाठी व संभाव्य जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी परशुराम घाट दि. २७ मार्च २०२२ ते दिनांक ०३ एप्रिल २०२३ या कालावधीत दु. १२.०० संध्याकाळी ६.०० वाहतुकीसाठी बंद ठेवणे बाबत विनंती करण्यात आली आहे. सदर बंद कालावधीत हलक्या वाहनांची वाहतुक चीरणी आंबडस चिपळुण या पर्यायी मार्गे वळवण्यात यावी तसे आदेश देण्याची विनंती पेण रायगड विभागाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून करण्यात रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे १७ मार्च रोजीच्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

गेल्या वर्षीच्या पावसात हा घाट धोकादायक बनला होता त्यामुळे गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. यावर्षीही या पावसाळ्यात हा घाट वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागू नये यासाठी परशुराम घाटात काम युद्धपातळीवरती सुरू आहे. हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्याने किमान सात दिवस घाट बंद राहणार आहे यासाठी पर्यायी मार्ग पावसाळ्यापूर्वी सज्ज करण्यात येईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी यापूर्वी दिली होती. चिरणी आंबडस या पर्यायी मार्गाला प्रमुख जिल्हामार्गाचा दर्जा देण्यात आला आहे या मार्गाच्या आपग्रेडेशचे कामही पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

# रेडी गणपती मंदिर कलशारोहण सोहळ्याला उत्साहात प्रारंभ

**वेंगुर्ले । वार्ताहर**

वेंगुर्ला तालुक्यातील श्री क्षेत्र रेडी येथील श्री गजानन संप्रोक्षण कलशारोहण कार्यक्रमाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. श्री गजाननाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे.या निमित्ताने आजपासून दि.२६, २७, २८ मार्च रोजी श्री देव गजानन देवस्थान नागोळेवाडी, रेडी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये चैत्रशुद्ध पंचमी रविवार दिनांक २६ मार्च रोजी सकाळी ८ वाजता शांतीपाठ प्रायश्चित यजमान शरीशुद्धी, त्यानंतर गणपती पूजन व ९ वाजता पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध त्यानंतर आचार्य वरणां, प्रकार शुद्धी तसेच गणेश याग व संप्रोक्षण विधि होणार आहे, तदनंतर दुपारी नैवेद्य आरती व सायंकाळी पाच वाजता स्थानिकांचे सुश्राव्य भजन आणि रात्री सात वाजता आजगावकर दशावतार नाट्य मंडळ आजगाव यांचा महान पौराणिक नाट्यप्रयोग देव झाला गुराखी हा नाट्यप्रयोग होणार आहे.

## डेगवे-फणसवाडीच्या पुलाचे काम प्रगती पथावर

त्यावेळी राहिले होते. सदर काम आता ठेकेदारांने सुरु केलेआहे.त्याची प्रत्यक्ष पहाणी करताना डेगवे ग्रामपंचायतीचे तरुण तडफदार सदस्य विजय देसाई छायाचित्रात दिसत आहेत. सदर पुलाला डेगवे गावातील, जमीनदारांनी आपली बहूमोल जमीन शासनास विनामूल्य देऊन दातृत्वाचा आदर्श घालून दिला आहे.शिवाय अतिदुर्गम भागात विकासासाठी सहकार्य केले आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीस व शासनास सहकार्य केले आहे.त्या बध्दल सर्व संबंधीत शासकीय अधिकारी यांचे व समाजातील सर्व लोकप्रतिनिधीचे आभार व्यक्त केले आहेत.

# शंभर कोटी निधीच्या कामांवरील स्थगिती उठवावी यासाठी गेलेल्या वैभव नाईक यांना मुख्यमंत्र्यांनी दिली धमकी

पान १ वरून..

हे पदे घेण्यासाठी नाही तर सेवा करण्यासाठी आहे मंत्री पदाने हुलकावणी दिली तरी तुम्ही शिवसेनेत कसे असा प्रश्न मला विचारला जातो मात्र, मला आजपर्यंत जी पदे मिळाली ती शिवसेने मुळेच मिळाली आहेत असेही आमदार नाईक म्हणाले. शिवसेनेतून आमदार फुटले तरी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मला फोन केला मी त्वरित ठाकरे याना भेटलो.

उद्धव ठाकरें सोबत व शिवसेने सोबत माझ्या माणसांसोबत राहण्याची भूमिका मी त्यावेळी घेतली. या पक्षाने मला आमदारकी दिली त्यामुळे या पक्षासोबतच राहण्यासाठी माझे मन माझ्या पाठीशी राहील. आज मला व माझ्या कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या जातात माझ्यावर एसीबी चौकशी लावली जाते मात्र, मी कोणतेही चुकीचे काम केलेले नाही त्यामुळे मी दबावाखाली येण्याचे कोणतेही कारण नाही. भविष्यातही माझ्या हातून कोणतेही चुकीचे काम होणार नाही, माझ्याकडील एक रुपया जरी गैर मार्गाचा असला तर मला फासावर लटकवा असे आमदार नाईक यांनी सांगितले. आडनावाच्या बदनामी प्रकरणी शिक्षा झाल्याने राहुल गांधींची खासदारकी रद्द होते, मग कणकवलीच्या नगराध्यक्षावर कारवाई का होत नाही. महाराष्ट्र हा लढणारा आहे मालवण तालुका नेहमी शिवसेना व समाजवादी यांच्या पाठीशी राहिला आहे. राज्यात पून्हा ठाकरेंचीच सत्ता येईल असेही आमदार नाईक म्हणाले.

मालवण नगरपालिकेत शिवसेनेच्या गेल्या पाच वर्षातील सत्ता काळात आपण अनेक कामे केली. तसेच शिवराजेश्वर मंदिर सुशोभीकरण, नवीन बंदर जेटी बांधली तसेच सिंधुदुर्ग किल्लूयावर जेटी बांधण्यात येणार असून शहरात मत्स्यालय व सुशोभीकरणाची कामे होऊ घातली आहेत. देवबाग तारकर्लीला नळपाणी योजना राबविण्यात येणार आहे.

धुपप्रतिबंधक बंधाऱ्याची कामेही मालवण तालुक्यात सर्वाधिक झाली आहेत, तौक्ते वादळात मालवण तालुक्यात ५६ कोटींची नुकसान भरपाई दिली. एलईडी मासेमारी विरोधातील आपली भूमिका कायम राहणार आहे, असेही आम. नाईक म्हणाले.

यावेळी बोलताना हरी खोबरेकर म्हणाले, आमदार नाईक एकनिष्ठ राहिले, त्यांनी गद्दारीचा डाग घेतला नाही. आज काहीजण आमदारांना मारण्याच्या धमक्या देत आहेत, मात्र आमदारांच्या केसालाही धक्का लावलात तर मालवणात पाय ठेवू देणार नाही, असा इशारा दिला. यावेळी मंदार ओरसकर यांनी आमदार वैभव नाईक यांचे स्वागत केले.

यावेळी तपस्वी मयेकर, पंकज सादये, नरेश हुले, राहुल परब, सन्मेष परब, तृप्ती मयेकर, गणेश कुडाळकर, मनोज मोंडकर, अनंत पाटकर, सिद्धेश मांजरेकर, महेंद्र म्हाडगूत, यशवंत गावकर, मोहन मराळ, दिलीप घारे, करण खडपे, आर्या गावकर, निनाक्षी मेतर, स्मृती कांदळगावकर, किरण वाळके, महेश जावकर, नीना मुंबरकर, अन्वय प्रभू, अमेय देसाई, नितीन हडकर, प्रवीण लुडबे, राजा शंकरदास आदी व इतर उपस्थित होते.

यावेळी नितीन वाळके, मंदार ओरसकर, सेजल परब, पूनम चव्हाण, मंदार केणी, महेश कांदळगावकर, दिलीप घारे यांनी विचार व्यक्त करत आमदार नाईक यांना शुभेच्छा दिल्या.

# कासवमित्र सुर्यकांत धुरी यांचा कासव महोत्सवात सन्मान

**आचरा । वार्ताहर**

कासव संवर्धन व संरक्षण मोहिमेत मोलाचा सहभाग दर्शविणारया आचरा पिरावाडी येथील कासव मित्र सुर्यकांत आबा धुरी यांच्या कार्याची दखल घेत वेंगुर्ला येथील कासव महोत्सवात जिल्हाधिकारी के मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरव केला गेला.धुरी हे गेली काही वर्षे अथक परिश्रम घेऊन आचरा किनाऱ्यावर येणाऱ्या दुर्मिळ अश्या कासवाच्या प्रजातीपैकी ऑलिव्ह रिडले कासवाच सवर्धन करत आहेत त्यांनी आज पर्यंत ११ घरट्याच्या माध्यमातून सुमारे १५०० कासवांच्या पिलांचे संवर्धन करत नैसर्गिक समुद्री अधिवासात सोडले आहे.त्यांच्या कार्याची दखल घेत शासनाच्या वतीनं सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी श्रीम के मंजुलक्ष्मी यांच्या हस्ते वेंगुर्ला वायंगणी येथील कासव जत्रेच्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला..या महोत्सवाला जिल्हाधिकारी के.मंजुलक्ष्मी यांच्या सोबत विशेष पोलिस महानिरीक्षक प्रविण पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर, पोलिस अधिक्षक सौरभ अग्रवाल यांच्याह वनपाल उपस्थित होते. कार्यक्रमात प्रास्ताविक रेड्डी, यांनी केल.सूत्रसंचालन काका सावंत यांनी तर आभार वनपरीक्षेत्र अधिकारी अमृत शिदे यांनी मानले.


**ग्रामपंचायत केरवडे कर्याद नारुर** तालुका-कुडाळ, जिल्हा- सिंधुदुर्ग

जावक क्र. २२४ / २०२३ | दिनांक : २५/०३/२०२३

**जाहीर निविदा - सुचना (टेंडर नोटीस)**

ग्रामपंचायत केरवडे कर्याद नारुर मधील खालील काम मक्त्याने दयावयाचे आहे. त्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून सदर कामासाठी सीलबंद निविदा मागविणेत येत आहेत. ज्यांना सदरचे काम मक्तयाने घ्यावयाचे आहे. त्यांनी आपले कडील निविदा सिलबंद लखोट्यातून ग्रामपंचायत कार्यालयमध्ये दिनांक २७/०३/२०२३ ते ०३/०४/२०२३ रोजी पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) दुपारी ३.३० वाजेपर्यत आणून द्यावयाच्या आहेत. सदरच्या निविदा दि. ०५/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किवा कार्यालयीन सोयीनुसार मासिक सभेत उघडणेत येतील.

**कामाचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म फी | काम पूर्ण करण्याची मुदत | ग्रामपंचायत बँक खाते नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केरवडे क. नारुर नळ पाणी पुरवठा योजना तयार करणे. | ८०१०००/- | ८०००/- | २००/- | ३० दिवस | सिं.जि.म.स. बँक शाखा कुडाळ ०१३४०७००००२६५ |


**अटी व शर्ती :**

१. निविदा सिलबंद लखोट्यातून पूर्ण नाव व पत्यासहित असाव्यात. २. निविदा मंजूर अगर ना मंजूर करण्याचा अधिकार तसेच निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. ३. कमी दराची निविदा मंजूर करण्यात येईल. ४. संबंधित ठेकेदाराने ग्रामपंचायतीस कामाच्या देयकातून कमीत कमी ५ टक्के कमिशन व इतर शासकीय वजावटी देणे बंधनकारक आहे. ५. निविदा मंजूर केल्यानंतर संबंधित ठेकेदाराने विहित अटी व शर्तीचा बाँडपेपर (रु.१००+ ५००) करारनामा करून देणे बंधनकारक आहे. ६. निविदा नामंजूर केल्यानंतर संबंधित ठेकेदाराशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. ७. सदरील काम सरपंच व मा.शाखा अभियंता (ग्रापापू.) जि.प. उपविभाग कुडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करून देण्याचे आहे.

सही/- **सरपंच**
ग्रामपंचायत केरवडे कर्याद नारुर
ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग

सही/- **ग्रामसेवक**
ग्रामपंचायत केरवडे कर्याद नारुर
ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग


## थोडक्यात



### अनधिकृत वाळू वाहतूक प्रकरणी पाच वाहने पकडली

**मालवण । वार्ताहर**

मालवण तालुक्यातील विविध मार्गावर मालवण तहसीलदार श्रीधर पाटील यांच्या नेतृत्वाखाली महसूल पथकाने धडक कारवाई केली. यात अनधिकृत वाळू वाहतूक प्रकरणी पाच वाहने पकडण्यात आली. पुढील कारवाईसाठी ही पाचही वाहने मालवण तहसील कार्यालयात आणण्यात आली आहेत.



### काजु लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाला ग्रामस्थांचा प्रतिसाद

**वेंगुर्ले । वार्ताहर**


प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला व परबवाडा ग्राम पंचायत व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने परबवाडा येथे काजु लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न झाले. यावेळी परबवाडा सरपंच सौ. शमिका बांदेकर, डॉ. संजयजी भावे संशोधन संचालक, डॉ. राजन खांडेकर सहयोगी संशोधन संचालक, डॉ. राजेंद्र भिंगार्डे उद्यानविद्यावेत्ता, डॉ विजय देसाई किटकशात्रज्ञ, श्री ललीत खापरे काजू शात्रज्ञ, डॉ. सौ स्मिता देशमुख मृदा शास्त्रज्ञ, कृषी सहाय्यक जीवन परब या सर्वांनी काजू लागवड कशी करावी, कोणती खते व कीटकनाशके वापरावी, मृदा परीक्षण का करावे, काजू उत्पादनातून आर्थिक सुलभता कशी मिळेल, वेंगुर्ला काजू मधील कोणत्या जातीच्या काजूची लागवड करावी. याबद्दल मार्गदर्शन केले यावेळी परबवाडा गावातील ५७ ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी उपसरपंच पपू परब, ग्राम सदस्य हेमंत गावडे, संतोष सावंत कार्तिकी पवार, गजानन परब, नरेंद्र नाईक हरिश्चंद्र मांजरेकर आदी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### गावठी दारुची हातभट्टी उध्वस्त

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

शहरानजीकच्या मिरजोळे - पाटीलवाडी येथे शहर पोलिसांच्या पथकाने गावठी दारुची हातभट्टी उध्वस्त करुन सुमारे १४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई रविवार २६ मार्च रोजी सकाळी करण्यात आली. अक्षय अविनाश पालकर (३३,रा. शिरगाव आडी, रत्नागिरी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्याविरोधात पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रविण बेंदरकर यांनी तक्रार दिली आहे. त्यानूसार, रविवारी सकाळी शहर पोलिसांच्या पथकाला मिरजोळे - पाटीलवाडी येथील नदीकिनारी गावठी दारुची हातभट्टी सुरु असल्याची माहिती मिळाली. याप्रकरणी अक्षय पालकर विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## थोडक्यात



### अचानक आग लागून शिरोडा येथे दुचाकी जळून खाक

**शिरोडा । वार्ताहर**

शिरोडा बाजारपेठ येथे गावडे प्रिंटिंग प्रेसच्या मागे लावलेली दुचाकी चालू करताना स्पार्क होऊन पेटली आणि त्या आगीत पूर्ण जळाली. यामध्ये सुदैवाने दुचाकी चालू करणारी युवती राय वेळीच बाजूला गेल्याने बचावली आहे. शिरोडा बाजार पेठ येथे आज सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सदर युवती घरी जाण्यासाठी आपली दुचाकी सुरू करत होती. मात्र दुचाकी सुरू करताना स्पार्क होऊन गाडीमधून धूर यायला लागला. बघता बघता काही क्षणात गाडीने पेट घेतला आणि गाडी जळून खाक झाली. आजूबाजूच्या ग्रामस्थांनी पाणी व अन्य साहित्याच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. दरम्यान याप्रकरणी उशिरापर्यंत पोलिस ठाण्यात कोणतीही नोंद करण्यात आली नव्हती.

### चूकीच्या आदेशाने ग्राम स्थावर हद्दपार होण्याची वेळ

**दोडामार्ग । वार्ताहर**


दोडामार्ग तालुका महसूल विभाग कार्यालय येथून जमिनीच्या खोट्या नोंदणी करुन सामाहिक जमीन धारकांना विश्वासात न घेता संमती न घेता परप्रांतीय यांच्या घशात जमीन घालण्याचे प्रकार वाढले असताना सासोली येथील शेकडो एकर सामाहिक जमीन स्थानिक जमीन धारकांना कल्पना न देता महसूल अधिकारी कर्मचारी यांनी खोटी कागदपत्रे ग्रामपंचायत कडून खोटे दाखले घेऊन ही जमीन दिल्ली येथील बलाढ्य मंडळीच्या ताब्यात दिली आहे त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होऊन दोषी अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई होऊन ही सनद रद्द करावी यासाठी १० एप्रिल रोजी उपोषण आंदोलन करण्याचा इशारा अन्याय ग्रस्त सासोली येथील ग्रामस्थ यांनी दिला आहे.



### सांगवे ते नाटळ रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण शुभारंभ

**कनेडी । वार्ताहर**

कणकवली तालुक्यातील सांगवे ते नाटळ १९०० मीटर रस्ता रुंदीकरण व डांबरीकरणासह काँक्रीट गटार बांधणे रक्कम रुपये १,५२,०४,७७७/- कामाचे भूमिपुजन माननिय आमदार नितेशजी राणे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले,सोबत उपस्थित माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री.संदेशजी उर्फ गोट्या सावंत, सौ.संजना सावंत, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेंद्र सावंत, प्रदेश कार्यकारणी सदस्य श्री. सुरेशजी सावंत, भाजप तालुका अध्यक्ष श्री. मिलिंद मेस्त्री, शक्ती केंद्र प्रमुख श्री.विजय भोगटे,भाजप पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### त्या कृत्याचा माणगाव शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध

**माणगाव । वार्ताहर**

माणगाव तिठा येथे आमदार वैभव नाईक यांच्या वाढदिवसाचे लावण्यात आलेले बॅनर रात्री-अपरात्री अज्ञान व्यक्तींकडून फाडले गेले. ज्या अज्ञात व्यक्तींनी कृत्य केले. हिम्मत असेल तर समोर येऊन बॅनर फाडावा पडद्यावर सुत्र हालू नका. असा इशारा माणगाव संघटक कौशल जोशी यांनी दिला आहे. माणगाव मध्ये आमदार वैभव नाईक यांची वाढती लोकप्रियता पाहून अशा प्रवृत्ती वृत्तीचा माणसाला आळा बसणे गरजेचे आहे. आम्ही या कृत्याचा माणगाव उद्धव ठाकरे गटाकडून जाहीर निषेध करतो.

# परसबाग स्पर्धेत तिवरे शाळेचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

कष्टाने उभी राहीली परसबाग माझ्या शाळेची शिंपल घामाचे पाणी गोष्ट आहे श्रमाची केद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेला आता प्रधानमंत्री पोशण शक्ती निर्माण योजना असे नाव दिले आहे. त्याचा एक भाग म्हणून शाळेच्या परसबागेतील भाजीपाल्याचा विद्यार्थ्यांच्या आहारात समावेश व्हावा. तसेच शाळेत अध्यापनासोबतच शाळेच्या परिसरात शेती पिकवण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. शाळेच्या परिसरात परसबाग फुलवून तेथील भाजीपाला शालेय पोषण अहारामध्ये वापरला जावा असा या योजनेमागील उददेश आहे. त्यासाठी शासनाने राज्यभरातील शाळांसाठी आयोजित केलेली परसबाग स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. दरम्यान प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमार्फत आयोजित परसबाग स्पर्धेत जिल्हातील कणकवली तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा तिवरे खालचीवाडी या शाळेने जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. याबद्दल शाळेचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

या उपक्रमातर्गत तिवरे शाळेच्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात विविध फळभाज्यांच्या व पाले भाज्यांच्या लागवडीसोबत विविध औषधी वनस्पतींची लागवड शाळेच्या परसबागेत केलेली आहे. त्याचे सेंद्रिय पद्धतीने योग्य संगोपन आणि व्यवस्थापन केलेले आहे. यामध्ये नांगरट प्रात्यक्षिकांसह लेंडी खत, शेण गोवर सेंद्रीय खतांचा वापर करुन परसबाग तयार केली. यात मेथी, आले, मोहरी, कोथींबीर, चवळी, मिरची, टोमॅटो, गवती चहा, पालक, लाल भाजी, मुळा, वाल, भेंडी, कारले या पीकांची लागवड करुन त्यांचे संगोपण करण्यासाठी विद्यार्थी, पालक,



शिक्षक यांनी मेहनत घेतली. त्याचबरोबर गवती चहा, लिंबू लोणचे, हळद लागवड करत हॅगिंग प्लांट, स्वत: बनवलेली प्लास्टिक झारीने या परसबागेत पाणी घालण्यात आले. ग्रामस्थ, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या मदतीने साकार केलेली परसबाग आज अनेक शाळांना आदर्शवत उपक्रम मार्गदर्शक ठरत आहे.

याबरोबरच शाळेचा कविता संग्रह प्रसिध्द झाला असून, येथील विद्यार्थी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा स्तरावर चमकले आहेत. नुसता हाच उपक्रम न घेता दैनंदीन जीवनात सकाळी उठल्यापासून लागणा-या वस्तूंची शाळेच्या व्हरांड्यात मांडणी करुन त्याची पूजा केली जाते. असे कुठेच न दिसणारं चित्र शाळेत प्रवेश करताना दिसते. त्याचबरोबर स्वच्छता ही काळाची गरज ओळखून विद्यार्थीमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी यासाठी सुका कचरा, ओला कचरा, प्लास्टिक यासाठी स्वतंत्र बजेट ठेऊन यासाठी नियोजन केल आहे.

परसबाग स्पर्धेत जिल्हात प्रथम आलेल्या या शाळेने अनेक उपक्रम राबविले असून, आता परसबाग स्पर्धेची राज्य स्तरीय टीम या शाळेला भेट देणार आहे. शाळेच्या या विशेष उपक्रम ाबद्दल त्यांच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम दास आंबेलकर, उपाध्यक्ष विनिता गोसावी, व्यवस्थापन समिती सदस्य, सरपंच रवींद्र आंबेलकर उपसरपंच राजेंद्र वाळवे, ग्राम पंचायत सदस्य सर्व ग्रामस्थ व पालक वर्गातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

या उपक्रमांतर्गत मुख्याध्यापक विजय शिरसाट, परसबाग प्रमुख संदीप कदम, विजय मेस्त्री, हेमंत राणे, सौ करूणा आंबेलकर, स्वयंपाकी, विद्यार्थी व पालक यांचे विशेष सहकार्य लाभले. शाळेच्या या यशाबद्दल जिल्हास्तरीय व तालुकास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल रोख रक्कम व प्रम ाणपत्र देऊन शाळेस गौरविण्यात आले आहे.

# मालवण येथील तरुणाची गळफास लावून आत्महत्या

मालवण



ओझर येथे आंब्याच्या झाडास निलेश गोविंद तोंडवळकर (वय-४२ रा. तोंडवळी वरची) या तरुणाने गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली.. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. पोलीस अधिक तपास करत आहेत.

आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास ओझर रस्त्यालगत असणाऱ्या आंब्याच्या झाडाला एका तरुणाचा गळफास लावलेल्या स्थितीत स्थानिकांना तसेच अन्य दुचाकीस्वारांना दिसला. हा मृतदेह निलेश तोंडवळकर यांचा असल्याचे समजताच त्यांचा भाऊ गणेश तोंडवळकर ग्रामस्थांसह घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलीस निरीक्षक विजय यादव, पोलीस उपनिरीक्षक नितीन नरळे, हेमंत पेडणेकर, सुभाष शिवगण, सुशांत पवार आदी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा केला. निलेश तोंडवळकर हे आज सकाळी ८ वाजता घरातून बाहेर पडले. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता ते स्थानिकांना ओझर येथून दुचाकीवरून जाताना दिसले. ओझर हायस्कूलच्या प्रवेशद्वाराच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर त्यांनी आपली दुचाकी लावलेली दिसून आली. १० वाजण्याच्या सुमारास ओझर रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना, स्थानिक ग्राम स्थांना आंब्याच्या झाडास त्यांचा मृतदेह गळफास लावलेल्या स्थितीत दिसून आला.




## सिंधुदुर्गच्या दोडामार्गमध्ये हत्तींचा वावर वाढला

**दोडामार्ग । वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या दोडामार्ग आता दिवसा ढवळ्या हत्ती फिरताना दिसत आहेत. शेतीची नासधूस करत हे जंगली हत्ती आता घरापर्यंत येत असल्यानं ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# कोकणात पहिल्यांदाच सापडली अश्मयुग कालीन उभ्या दगडावरची कातळशिल्पे

**देवगड । पांडूशेठ साटम**

देवगड तालुक्यात साळशी येथे उभ्या दगडात कोरलेली दोन कातळशिल्पे (पेट्रोग्लिफ्स) आढळली आहेत. जमिनीलगत सपाट कातळावर कोरलेली कातळचित्रे अनेक ठिकाणी आढळतात. मात्र, उभ्या दगडात कोरलेली कातळचित्रे कोकणात प्रथमच सापडली असल्याचा दावा देवगड तालुका इतिहास संशोधन मंडळाने केला आहे.

झाडी तोडून साफ करताच उभ्या दगडावरची कातळशिल्पे सापडली.

तालुक्यातील साळशी येथील नैसर्गिक ओहोळालगतच एक प्राचीन पुष्करणी आहे. या भागात नुकताच सिमेंट काँक्रिटचा बंधारा बांधण्यात आला. तेव्हा या भागातील वाढलेली झाडी तोडून साफसफाई करण्यात आली.



बंधाऱ्यालगतच सुमारे दहा-पंधरा फूट उंचीचा मोठा दगड आहे. या दगडावर काहीतरी लिपी कोरलेली असल्याचे वाटल्याने साळशी येथील मुकुंद भटसाळस्कर यांनी इतिहास संशोधन मंडळाच्या योगेश धुपकर यांना याबाबत माहिती दिली. कोणता तरी शिलालेख सापडल्याचे कळताच तातडीने मंडळातर्फे साळशी मोहीम आखण्यात आली. या वेळी अभ्यासकांना दोन पेट्रोग्लिफ्स म्हणजेच कातळचित्रे सापडली. या नैसर्गिक भव्य दगडावर एका बाजूस दगड तासून सपाट केला असून, त्यावर दोन प्राणी कोरलेले आहेत.

गेल्या काही वर्षांत रत्नागिरीपासून कुडाळ, वेंगुर्लेपर्यंत दीड हजाराहून अधिक कातळचित्रे अनेक संशोधकांच्या व हौशी अभ्यासकांच्या प्रयत्नांतून उजेडात आली. ही सर्वच कातळचित्रे जमिनीलगत सपाट कातळावर कोरलेली आहेत. जमिनीलगत सपाट कातळावर कोरलेली कातळचित्रे हे कोकणचे वैशिष्ट्य आहे; मात्र, साळशी येथे उभ्या दगडात कोरलेले कातळचित्र आढळले आहे. या कातळचित्रांचा शोध घेण्याच्या मोहिमेत पुरातत्त्व अभ्यासक रणजित हिर्लेकर यांच्याबरोबर योगेश धुपकर व अजित टाककर सहभागी झाले.

# कणकवलीत रंगपंचमीला हाणामारी, चौघांवर गुन्हा

**कणकवली । वार्ताहर**

कणकवली शहराची रंगपंचमी मंगळवारी खेळली जात असतानाच शहरातील बांधकरवाडी येथे रंगपंचमीनंतर हाणामारीची घटना घडली. याप्रकरणी चौघा युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्याद मनीष महेश सावंत (२२, रा. मधलीवाडी) यांनी दिली असून त्यानुसार कणकवली-बांधकरवाडी येथील प्रणय मर्गज, सुमीत राणे, रजत राणे, अनिकेत म्हाडेश्वर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल फिर्यादीनुसार, मनीष सावंत हा २१ मार्च या रंगपंचमीदिवशी सायं. ५.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या घराजवळ उभा होता. त्याचवेळी बांधकरवाडी येथील काही तरुण तेथे घोळका करून होते. मनीष याने या तरुणांना 'आपणास घरी



जायचे आहे, वाटेतून बाजूला व्हा' असे सांगितले. यावरून वरील तरुणांनी मनीष याला 'रस्ता तुझ्या बापाचा आहे का?' असे विचारत त्याला मारहाण केली. शिविगाळ करीत मनीषच्या मानेवर दांड्याने मारहाण केली.

यावेळी मनीषची आई व काकी हाणामारी सोडवायला आली असता त्यांनाही धक्काबुक्की केली तसेच घरात घुसून मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फिर्यादीनुसार संशयितांवर भादंवि कलम ४५२, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार विनोद सुपल करीत आहेत.

# बारसू रिफायनरी प्रकल्पग्रस्त म्हणून 'गुप्ता' 'शहा' आणि 'मिश्रा' यांची नावे लागणार?

**राजापूर । वार्ताहर**

एखाद्या ठिकाणी मोठा प्रकल्प येणार असेल तर तो जाहीर होण्यापूर्वीच तिथल्या जमिनी मोठ्या प्रमाणात राजकारणी आणि राजकीय व्यक्तींशी संबंधित असलेले व्यावसायिक खरेदी करण्यास सुरवात करतात. स्थानिक जमीनमालकांना या प्रकल्पाची कल्पनाही नसते त्यामुळे ते कमी भावात जमिनी विकून आपले नुकसान करतात. या खरेदी केलेल्या जमिनी प्रकल्पात गेल्या तर जमिनीचा चांगला भाव तर मिळतोच त्याबरोबर प्रकल्पग्रस्त म्हणून शासनाकडून अतिरिक्त फायदे पण मिळतात. जरी या जमिनी प्रकल्पात गेल्या नाही तरी फायदा होतो. कारण प्रकल्पाच्या आजूबाजूच्या जमिनीचे भाव गगनाला भिडतात. उदाहरण द्यायचे झाले तर बारसू सोलगाव येथे प्रस्तावित असलेला रिफायनरी प्रकल्प. या प्रकल्पाच्या जागेवर आणि आजूबाजूस परप्रांतीयांनी मोठ्या प्रमाणात जागा खरेदी केल्याचे धक्कादायक वास्तव माहिती अधिकारात समोर आले आहे. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे सचिव समीर शिरवाडकर यांनी ही सगळी माहिती माहितीच्या अधिकारात मिळवली आहे. या सगळ्याची माहिती देणारा एक ई-मेल शिरवाडकर यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे १६ मार्च रोजी पाठवला होता. त्यावर आपला ई-मेल अर्ज प्राप्त झाला असून पुढील कार्यवाहीसाठी महसूल विभागाकडे पाठवण्यात आला आहे, असे उत्तर मुख्यमंत्री कार्यालयाकडून शिरवाडकर यांना देण्यात आले. या सगळ्या जमीन खरेदीच्या व्यवहारात राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी व परप्रांतीयांचा समावेश असल्याचा आरोप शिरवाडकर यांनी केला आहे. राजापूर तालुक्यातीलच बारसू आणि सोलगावसह आसपासच्या गावामध्ये ही जमीन खरेदी केली गेली आहे. दरम्यान मागील दोन वर्षांमध्ये शेकडो एकर जमीन खरेदीचे व्यवहार याभागात झाल्याची बाबही माहिती अधिकारातून उघड आली आहे. वारिसे यांच्या हत्येनंतर येथील बारसू प्रस्तावित रिफायनरी विशेष चर्चेत आली आहे. हा प्रकल्प उभारताना गैरप्रकार झालेत असे आरोप करण्यात येत आहेत. त्याची चौकशी व्हावी यासाठी विरोधकांनी मागणी केली आहे. तसेच या जमिनी विकत घेताना बळजबरीचा वापर केला गेला असेल तर त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# उष्माघातामुळे फळगळ; हापूस आंब्यासमोर संकटांची मालिका; शेतकरी हवालदिल

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

कोकणचा हापूस आंबा जगात प्रसिद्ध. अगदी इंग्लंडच्या राणीने देखील हापूस आंब्याची चव चाखल्यानंतर ती त्याच्या प्रेमात पडली. पण याच हापूस समोर सध्या संकटांची मालिका उभी आहे. उशिराने आलेला मोहर, मग थ्रिप्स आणि तुडतुडा रोगाचा प्रादुर्भाव आणि आता उष्माघातामुळे फळगळ, यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता आहे.

**हापूस आंब्यासमोर संकटांची मालिका**

लांबलेला पावसाळा आणि उशिराने सुरु झालेली थंडी यामुळे हापूस काहीसा उशिराने मोहरला. त्यानंतर देखील या मोहरावर थ्रिप्स आणि तुडतुडा या रोगाचा प्रादुर्भाव वाढला. परिणामी मोठ्या प्रमाणात औषध फवारणी करावी लागली. अशा परिस्थितीमध्ये काही प्रमाणात का असेना हापूस हाताशी लागेल अशी आशा इथल्या शेतकऱ्यांना होती. पण सध्या वातावरणात उष्मा वाढला असून त्याचा परिणाम आता हापूसवर जाणवत आहे. कारण सध्या झालेल्या फळधारणापैकी जवळपास ७५ टक्के हापूस हा गळून पडत आहे. परिणामी कोकणातला शेतकरी पूर्णतः हतबल झाला आहे. अशा या परिस्थितीमध्ये तो मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता देखील आहे. त्यामुळे आता या वातावरण बदलाचा अभ्यास अभ्यासकांनी करावा आणि त्यातून किमान काय



मार्ग असेल तर सुचवावा, अशी मागणी हा शेतकरी करत आहेत.

**मे महिन्यात आंब्याची कमतरता भासेल : आंबा उत्पादक शेतकरी**

बदलत्या हवामानामुळे हापूस आंब्याला फटका बसत आहे. रोगामुळे नाईलाजाने औषधांची फवारणी करावी लागते. मार्चमध्ये लोकांकडे आंबा होता, तो जास्तीत जास्त एप्रिल महिन्याच्या १० तारखेपर्यंत मिळेल. त्यानंतर आणि मे महिन्यात आंब्याची कमतरता भासेल. मागच्या मोहरावर अवलंबून होतो, पण त्यावरही वातावरण बदलाचा परिणाम झाला आहे. या वातावरण बदलाचा आंब्यावर होणाऱ्या परिणामां बाबत अभ्यासकांनी संशोधन करावं आणि त्यातून किमान काय मार्ग असेल तर सुचवावा, अशी प्रतिक्रिया हापूस उत्पादक शेतकरी प्रदीप सावंत यांनी दिली.

**सन बर्नमुळे फळगळ**

फळांचा राजा कोकणचा हापूस आंब्याला सततच्या बदलत्या वातावरणाचा फटका बसला आहे. कोकणात दिवसा तापमानात झालेल्या वाढीमुळे उष्माघाताचा फटका आंब्याला बसला आहे. बहुतांश ठिकाणी आंब्यावर डाग उठल्याने आंबे खराब होऊन गळू लागले आहेत. सन बर्न झालेले हे आंबे बागायतदारांना फेकून देण्याशिवाय पर्याय नाही.

# तरुणाने घेतला लहान भावाचा जीव; आई-वडिलांसह सर्वांना बसला धक्का

**कणकवली । प्रतिनिधी**

सिंधुदुर्गात कौटुंबिक कलहातून सख्ख्या भावाकडून भावाचाच खून होण्याची गेल्या पंधरा दिवसांतली ही तिसरी घटना आहे. कुंभवडे-चिरेखणवाडी येथे आंतोन झुजे डिसोजा, सौ. मार्टीना डिसोजा, मोठा मुलगा आयसिन, लहान मुलगा स्टॅनी असे एकत्र राहतात. संशयित आयसिन याचे लग्न झाले असून त्याची पत्नी व मुलगी मुंबई येथे शिक्षणासाठी राहतात. तर लहान मुलगा स्टॅनी हा मुंबई येथे वेल्डींगचे काम करायचा.

मागील तीन महिन्यांपासून तो गावी कुंभवडे येथे रहाण्यास आला होता. तो अविवाहीत होता. तर आयसिन हा गोवा येथे हॉटेलमध्ये कामास होता. तो मागील पंधरा दिवसापासून गावी कुंभवडे येथे आला होता. रागीट स्वभावाचा असलेला आयसिन हा सातत्याने भाऊ स्टॅनी याचा राग करत असे. त्याला घरातील चाकू दाखवून मला कुणी अटॅक केला तर त्याला मारेन असे बोलत असे. बुधवारी रात्री १० वा.च्या सुमारास स्टॅनी याचे आई, वडील आणि आयसिन असे एकत्र जेवले. जेवण झाल्यानंतर आयसिन फोनवर बोलण्याकरीता घराच्या बाहेर गेला होता. त्यावेळी त्याचा भाऊ स्टॅनी रात्री १०.४५ वा.च्या सुमारास घरी आला. त्याने आईला जेवण काय बनवले आहे?अशी विचारणा केली. त्यावेळी आईने आज मासे आहेत, जेवून घे, आयसिनच्या तोंडाला लागू नकोस असे सांगितले. तेव्हा स्टॅनी हा किचनमध्ये जेवण घेण्यासाठी गेला. त्यानंतर आई झोपण्यासाठी गेली. काही वेळाने किचनमधून स्टॅनी आणि आयसिन या दोघांचा भांडणाचा आवाज ऐकू आला. म्हणून आई मार्टीना ही किचनकडे धावत आली असता आयसिन याने त्याचा लहान भाऊ स्टॅनी याच्या पोटात चाकू घुसवून तो बाहेर काढल्याचे पाहिले. त्यानंतर स्टॅनीच्या पोटातून रक्त बाहेर आले. दोघांची झटापट सुरूच होती. आई मार्टीना ही त्यांना सोडविण्यासाठी गेली असता स्टॅनी हा जमिनीवर पडला आणि आयसिन हा घराच्या बाहेर निघून गेला.

मार्टीना हिने मोठमोठ्याने ओरडाओरड केली असता शेजारील हेलन डिसोजा, जोसेफ डिसोजा, लुसी डिसोजा, रॉबर्ट डिसोजा, फॅलेक्स डिसोजा हे त्या ठिकाणी धावत आले. झाला प्रकार पाहून कुणीतरी ॲम्ब्युलन्स बोलावली. काही वेळात ॲम्ब्युलन्स घराकडे आली. ॲम्ब्युलन्स मधील डॉक्टरांनी स्टॅनी याला तपासून पाहिल्यानंतर तो मयत झाल्याचे सांगितले. सख्ख्या भावानेच भावाचा खून केल्याने कुंभवडेत एकच खळबळ उडाली.

**कणकवली पोलिस घटनास्थळी दाखल**

कुंभवडेतील खुनाची घटना समजताच कणकवलीचे पोलिस निरीक्षक अनिल जाधव, हवालदार चंद्रकांत झोरे, सचिन माने आदी रात्रीच कुंभवडेत घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाचा पंचनामा करत शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठवून संशयित आयसिन याला ताब्यात घेतले. याप्रकरणी मयत स्टॅनी याची सौ. मार्टीना डिसोजा यांनी मुलगा आयसिन याच्याविरूध्द स्टॅनीचा पोटात चाकू घुसवून खून केल्याची तक्रार पोलिसांकडे दिली. याप्रकरणी आयसिन डिसोजा याच्याविरूध्द पोलिसांनी भादवि ३०२ नुसार खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी विचारणा केल्यानंतर संशयित आयसिन याने खुनाची कबुली देत भाऊ स्टॅनी हा स्वत:ला मोठा स्ट्राँग समजत होता, म्हणून त्याला मारल्याचे पोलिसांना सांगितले. याप्रकरणी तपास पोलिस निरीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कणकवली पोलिस करत आहेत.

**आयसिन आला होता भावाची तक्रार घेवून पोलिस स्थानकात**

संशयित आरोपी आयसिन हा चार दिवसापूर्वी त्याचा आता मयत झालेला भाऊ स्टॅनी याच्याविरूध्द कणकवली पोलिस स्थानकात तक्रार देण्यासाठी आला होता. मात्र त्याने काही तक्रार दिली नव्हती. आता पोलिसांशी बोलताना जर मी तक्रार दिली असती तर हा प्रकार घडला नसता असे त्याने सांगितले. दुपार नंतर आयसिन आणि स्टॅनी यांनी शेजारी एकत्र टीव्हीवर मॅच बघितली होती. मात्र रात्री अचानक आयसिनच्या डोक्यात राग शिरला आणि त्याने भावाचा जीव घेतला. चार दिवसापूर्वी त्याने भावाला तर सहा महिन्यापूर्वी आईला धमकी दिल्याचेही पोलिस तपासात पुढे येत आहे.